POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२०४ ● मुंबई, सोमवार, २४ फेब्रुवारी २०२५ ● पृष्ठ-४ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## मस्साजोग ग्रामस्थांचा सुरेश धसांना पाठिंबा!

# मनोज जरांगेंनी डागली तोफ

■मुंबई । प्रतिनिधी :

संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणानंतर भाजप आमदार सुरेश धस यांनी सुरुवातीपासूनच आक्रमक भूमिका घेतल्याचे पाहायला मिळाले. सुरेश धस यांनी हे प्रकरण सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेर लावून धरले होते. तर संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर आकाचे आका म्हणत सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्या जोरदार हल्लाबोल केला होता. मात्र काही दिवसांपूर्वीच त्यांनी मंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेतली होती. या भेटीची बातमी बाहेर येताच सुरेश धस यांच्यावर विरोधकांनी जोरदार हल्लाबोल केला. यानंतर सुरेश धस हे आज मस्साजोग गावात दाखल झाले. त्यांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. यावेळी मस्साजोगच्या ग्रामस्थांनी टीकेचे धनी झालेल्या सुरेश धस यांना पाठिंबा दिला. यावरून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सुरेश धस यांच्यावर तोफ डागली आहे.

**नेमकं काय म्हणाले मनोज जरांगे?**

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, माझ्यासाठी तो विषय संपला आहे. त्यावर मला बोलायचं नाही. मी एवढा जीव लावला होता, समाजाने त्यांना तळ हातावर घेतलं होतं. एवढ्या क्रूर माणसाला जाऊन भेटण्याची गरज नव्हती. तुमच्यावर पक्षाचा दबाव होता तर तुम्ही सरळ सांगायला पाहिजे होतं की पक्षाने माझ्यावर दबाव आणलेला आहे. मला सांगत आहेत मॅटर दाबून टाक तू मागे सरक, सुरेश धसांनी अशी सरळ प्रेस घ्यायला पाहिजे होती. मी समाजाची गद्दारी करू शकत नाही हे धसांनी म्हणायला पाहिजे होतं. मी धनंजय मुंडे यांना भेटायला जात नाही. मी पक्षाचा आणि आमदारकीचा पण राजीनामा देत आहे, असं धस यांनी म्हणायचं होतं. धस यांच्या विषय माझ्यासाठी संपलेला आहे, अशी टीका त्यांनी केली.

**सुरेश धसांना परळीत मुंडे समर्थकांचा विरोध**

दरम्यान, भाजप आमदार सुरेश धस यांनी मस्साजोग येथे संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेतल्यानंतर ते परळी येथे महादेव मुंडे यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. यावेळी महादेव मुंडे यांचं कुटुंब भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. या भेटीनंतर एका कार्यकर्त्याच्या घरी जात असताना सुरेश धस यांना धनंजय मुंडे यांच्या समर्थकांकडून विरोध करण्यात आला. काळे झेंडे दाखवून सुरेश धस यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.





### जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत सत्कार स्वीकारणार नाही

संतोष देशमुख हत्या प्रकरणात जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत स्वागत सत्कार स्वीकरणार नाही, अशी भूमिका भाजप आमदार सुरेश धस यांनी घेतली आहे. धाराशिव येथील कार्यक्रमात आमदार सुरेश धस यांनी सत्कार नाकारल्याचे पाहायला मिळाले. मंत्री जयकुमार गोरे यांची धाराशिव जिल्हा संपर्क प्रमुख म्हणून नियुक्ती आणि भाजप नेते सुजितसिंह ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सत्कार समारंभात सुरेश धस बोलत होते. यावेळी भाजप आमदार सुरेश धस हे कार्यक्रमाला व्यासपीठावर उपस्थित होते, मात्र त्यांनी सत्कार स्वीकारण्यास नकार दिला.

**सुरेश धस यांनी 22 फेब्रुवारीला घेतली होती संतोष देशमुख कुटुंबियांची भेट**

दरम्यान, भाजप आमदार सुरेश धस यांनी २२ फेब्रुवारीला मस्साजोग गावात जाऊन संतोष देशमुख कुटुंबियांची भेट घेतली होती. संतोष देशमुख हत्या प्रकरणात आकाचे आका म्हणत सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्याविरोधात जोरदार राळ उडवून दिली. मात्र काही दिवसांपूर्वी त्यांनी त्याच धनंजय मुंडेंची दोन वेळा भेट घेतल्याचं उघड झाल्यावर सुरेश धस प्रचंड टीकेचे धनीही झाले होते.

### आरोपींना पळण्यासाठी या लोकांनी केली मदत

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात अनेक आरोप-प्रत्यारोप होत आहे. या प्रकरणातील आरोपींना अटक झाली आहे. त्यानंतर आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी केली जात आहे. मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील, भाजप आमदार सुरेश धस यांच्या प्रमाणे संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख हे सरकारकडे वेगवेगळ्या मागण्या करत आहेत. आता भाजप आमदार सुरेश धस यांनी संतोष देशमुख खून प्रकरणात धाराशिव कनेक्शनचा उघड केले. धाराशिवमधील वाशीच्या पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांनी संतोष देशमुख यांच्या हत्येतील आरोपींना पळून जायला मदत केली. नितीन बिक्कड यातील आरोपी आहे. या सर्वांची चौकशी होऊन स्वतंत्र मकोका लावावा किंवा सहआरोपी करावे, अशी मागणी सुरेश धस यांनी केली. भाजपाचे आमदार सुरेश धस यांचे गंभीर आरोप करत मोठी मागणी केली. ते म्हणाले, अधिकारी सांगतात आरोपी जंगलातून पळून गेले. परंतु आरोपी जंगलातून पळून गेले नाहीत. ते वाशी शहरातून गेले आहे. वाशी पोलीस ठाण्यामधील काही अधिकारी कर्मचाऱ्यांनी या आरोपींना फरार होण्यासाठी मदत केली.

**मनोज जरांगेंवर म्हणाले...**

मनोज जरांगे यांच्या नाराजीवर बोलण्यास सुरेश धस यांनी नकार दिला. ते म्हणाले, मनोज जरांगे माझे दैवत आहे. त्यांच्यावर मी काहीही बोलणार नाही. कोल्हापूर येथे होणारे मराठा समाजाचे अधिवेशन हे जिल्हा पुरते आहे. त्यामुळे त्या अधिवेशातून मनोज जरांगे यांना डावले, असा त्याचा अर्थ कोण काढू नये, असे आमदार सुरेश धस यांनी म्हटले आहे.

# १० मागण्या...१० दिवसांची डेडलाईन...

## ४२ मराठा संघटना एकवटल्या... सरकारला घाम फुटणार?



**काय आहेत मागण्या?**

- महाराष्ट्र शासनाने ओ. बी. सी समाजाला ज्या ज्या सोयी सवलती लागू केल्या आहेत. त्या जशाच्या तशा मराठा समाजाला सरसकट लागू करण्यात याव्यात.
- हैदराबाद गॅझेट, सातारा गॅझेट, बॉम्बे गॅझेटनुसार महाराष्ट्र शासनाने आरक्षणाची अमंलबजावणी करावी
- महाराष्ट्रामध्ये ओ. बी सी प्रमाणे एस. ई. बी. सी (मराठा समाज) प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रतिपुर्ती करावयाच्या इतर शुल्काबाबतची सवलत द्यावी
- महाराष्ट्रामध्ये कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी जिल्हा व तालूका पातळीवर समिती गठण करून या समितीमध्ये मराठा समाजाच्या दोन प्रतिनिधींना समाविष्ट करून घ्यावे.
- महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असणारे व परराज्यात शिकणाऱ्या ओ बी सी प्रवर्गातील विद्यार्थ्यांप्रमाणे शिष्यवृत्ती योजना मराठा समाजाला लागू करणे बाबत
- महाराष्ट्रात ओ.बी.सी प्रमाणे एस. ई. बी. सी प्रवर्गातील युवक युवती करीता मोटर वाहन चालक व वाहक प्रशिक्षण योजना लागू करणेबाबत
- मराठा आंदोलकांवर दाखल झालेले गुन्हे मा. उच्च न्यायालयाच्या निदेर्शानुसार तसेच शासन निर्णय यानुसार तपासून मागे घेण्यात यावेत
- मराठा समाजाला एस. ई. बी. सी प्रवर्गा अंतंगत १०% आरक्षण लागू केले आहे. सद्या ते न्यायप्रविष्ट आहे. ते राज्य शासनाने न्यायालयामध्ये आपली बाजू भक्कम मांडून आरक्षण टिकवावे
- मराठा भुषण आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ हे फक्त मराठा समाजाला लागू करावे. तसेच व्याज परतावा व इतर कर्ज प्रकरणे वेळेत पुर्ण करण्यात यावेत.
- अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचे काम तातडीने चालू करावे.
- महाराष्ट्रातील गड-किल्ल्यांचे सवंर्धन करण्यात यावे.

■मुंबई । प्रतिनिधी :

मराठा समाजाला आरक्षण मिळावं यासाठी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मोठा लढा उभारला, त्यांच्या आंदोलनानंतर सरकारनं मराठा समाजासाठी स्वतंत्र आरक्षणाला मंजुरी दिली. मात्र आम्हाला ओबीसीमधूनच आरक्षण पाहिजे या आपल्या मागणीवर मनोज जरांगे पाटील अद्यापही ठाम आहेत. तर दुसरीकडे आता मराठा समाज देखील चांगलाच आक्रमक झाला आहे. कोल्हापुरात मराठा समाज संघटनांची बैठक पार पडली, या बैठकीला मराठा समाजाचे अनेक नेते उपस्थित होते. या बैठकीनंतर पुन्हा एकदा सरकारला इशारा देण्यात आला आहे. या बैठकीमध्ये राज्यातील तब्बल ४२ मराठा संघटना सहभागी झाल्या होत्या. मराठा समाजाच्या परिषदेसाठी दहा मार्चपर्यंत मुख्यमंत्र्यांनी वेळ द्यावा, अन्यथा अधिवेशन काळातच आंदोलन छेडू, असा इशारा मराठा संघटनांच्या वतीनं राज्य सरकारला देण्यात आला आहे. लवकरच परभणीमध्ये मराठा समाजाची परिषद होणार आहे. सुरवातीच्या टप्प्यात सरकारसोबत चर्चेला प्राधान्य दिलं जाईल, मात्र दखल न घेतल्यास रस्त्यावरच्या लढाईचा मार्ग मोकळा असेल, असा इशारा यावेळी आंदोलक सुरेश पाटील यांनी दिला आहे. तर दुसरीकडे मनोज जरांगे पाटील आणि आमचं आंदोलन एकच असेल, मात्र आरक्षणाशिवाय अन्य काही मागण्या आम्ही करणार आहोत, मागण्या सरकारनं मान्य केल्याच पाहिजे अशी प्रतिक्रिया यावेळी आंदोलक ज्योती मेटे यांनी दिली आहे.

**सरकारची डोकेदुखी वाढणार?**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजासाठी मोठा लढा उभारला, त्यांच्या आंदोलनानंतर सरकारने मराठा समाजासाठी स्वतंत्र आरक्षणाला मंजुरी दिली, मात्र तरी देखील हा आरक्षणाचा तिढा अद्याप सुटलेला नाहीये, आम्हाला ओबीसीमधूनच आरक्षण हवं आहे, अशी जरांगे पाटील यांची मागणी आहे. तर दुसरीकडे ओबीसी समाजातून या मागणीला मोठा विरोध होत आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या प्रश्नाचा गुंता वाढला आहे. दुसरीकडे आता मराठा समाजानं पुन्हा एकदा सरकारला इशारा दिला आहे. मागण्या मान्य न झाल्यास अधिवेशन काळात आंदोलन करू असं म्हटलं आहे. तसेच रस्त्यावर देखील उतरू असाही इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे येत्या काळात पुन्हा एकदा वातावरण तापण्याची शक्यता आहे.

## पुण्यातील २ एकर जागेवरुन महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा वाद

# एकनाथ शिंदेवर भाजपचा गंभीर आरोप

या भूखंडावर शासकीय कर्करोग रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव आहे. मात्र तो डावलून हा भूखंड खासगी विकासकाला पोटभाडेकरारावर देण्याचा निर्णय एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना झाल्याचा आरोप पुण्यातील भाजपने केला आहे. हा व्यवहार थांबवून तेथे प्रस्तावित कर्करोग रुग्णालय उभारावं अशी मागणी भाजपनं केलीये. पुण्यामध्ये एकही शासकीय कर्करोग रुग्णालय नाही. ससून उपचार रुग्णालय हे पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठे शासकीय रुग्णालय आहे. त्यामुळे शिंदे सरकारने घेतलेला निर्णय रद्द करून ससून परिसरातील या भूखंडावर कर्करोग रुग्णालय उभारण्यात यावं अशी मागणी होत आहे.

■मुंबई । प्रतिनिधी :

पुण्यात महायुतीत एका भूखंडावरून आता वादाची ठिणगी पडली आहे. मंगळवार पेठेतील २ एकर जागेचा वाद उफाळून आला आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना हा भुखंड खासगी विकासकाला देण्याचा निर्णय घेतल्याचा आरोप भाजपनं केलाय..तो निर्णय रद्द करण्याची मागणी आता स्थानिक नेत्यांनी मुख्यमंत्री फडणवीसांकडे केलीय.

पुण्यातल्या ससून रुग्णालयाजवळ मंगळवार पेठेतील हि सुमारे २ एकर मोक्याची जागा. या जागेमुळे पुण्यात शिवसेना आणि भाजपात वादाची शक्यता आहे. सध्या हा भूखंड एमएसआरडीसी म्हणजेच महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळच्या ताब्यात आहे.



अतिशय मोक्याच्या अशा या भूखंडाची किंमत आजघडीला किमान ४०० कोटी रुपये आहे. असं असताना हा शासकीय भूखंड एका खाजगी विकासकाला अवघ्या ७० कोटींमध्ये ६० वर्षांसाठी भाडेपट्टयावर देण्याचा घाट घालण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

क्लस्टर डेव्हलपमेंट योजनेची पहिली इमारत ठाण्यात तयार झाली आहे.. किसननगर येथे रबर इंडिया आणि दोस्ती डेव्हलपर्सच्या भूखंडावर सिडकोकडून बांधण्यात येणाऱ्या क्लस्टरच्या पहिल्या इमारतीतील तीन विंगचे १७ मजले तयार झाले आहेत. तर रबर इंडियाच्या इमारतीचे सहा मजले तयार झाले आहेत. या दोन्ही इमारती वर्षभरात पूर्ण होणार असून, आतापर्यंत स्वप्नवत भासणारा क्लस्टर प्रकल्प दृष्टिपथात आला आहे.

## अंगणात वडिलांचा मृतदेह, घरात शोकाकुल वातावरण

# भरल्या डोळ्यांनी लेकीने दिला दहावीचा पेपर!

■लातूर । प्रतिनिधी :

आयुष्य कधी कठीण परीक्षा घेईल, याचा नेम नाही. पण अशा परिस्थितीला खंबीरपणे सामोरे जाणाऱ्या व्यक्तींकडे समाज आदराने पाहतो. लातूरच्या औसा तालुक्यातील भादा गावातील निशा नागनाथ उबाळे ही अनेकांसाठी आदर्श ठरलीय. निशाची दहावीची परीक्षा सुरु आहे. परीक्षा सुरु असताना तिच्या वडिलांचे निधन झाले, त्यांचा मृतदेह अंगणात होता. घरात शोकाकुल वातावरण होते. तरीही निशाने आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवत दहावीची परीक्षा दिली.

गेल्या काही दिवसांपासून निशाचे वडील नागनाथ उबाळे हे आजारी होते. त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत नव्हती. परीक्षा सुरू असतानाच अचानक त्यांचे निधन झाले. वडिलांच्या अंत्यसंस्कारात राहायचं की पेपर द्यायचा? असा प्रश्न निशासमोर होता. आई आणि कुटुंबियांनी तिला समजावले. वडील नेहमी निशाच्या शिक्षणाला प्राधान्य देत होते. त्यामुळे निशाने धैयार्ने निर्णय घेतला आणि परीक्षा केंद्र गाठले. डोळ्यांत अश्रू होते, मन गहिवरले होते, पण तिने पेपर लिहिला. तिच्या या जिद्दीला आणि संयमाला गावकऱ्यांनी सलाम केला.

निशा नागनाथ उबाळे ही भादा येथील शाळेत दहावीला आहे. तिचा मराठीचा पहिला पेपर होता. दहावीची तयारी करून परीक्षेला सामोरे जाण्याची जय्यत तयारी केलेल्या निशाला नियतीने जबर धक्का दिला. निशाचे वडील नागनाथ उबाळे यांचे गुरुवारी सायंकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. घरात ती, आई, एक भाऊ आणि आज्जी असे चारच लोक. बापाच्या अचानक निधनाने निशा व तिचे कुटुंब सैरभैर झाले.



वडिलांच्या निधनाची बातमी कळताच निशाच्या हातातील पुस्तक गळून पडले. हंबरडा फोडून रडणाऱ्या निशाला आपल्या परीक्षेचा विसर पडला. मात्र निशाचे शिक्षक शिवलिंग नागापुरे आणि शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रेम लटूरे यांनी निशाचा पेपर वाया जाऊ नये यासाठी निशाच्या नातेवाईकांची भेट घेतली. तिच्या कुटुंबातील व्यक्तींना विश्वासात घेतले. निशाचे समुपदेशन केले. डोळे पुसत निशा वडिलांनी पाहिलेल्या स्वप्नांना साकार करण्यासाठी तयार झाली. एकीकडे बाप अनंतात विलीन होण्यासाठी परत कधीही न येणाऱ्या मार्गवर होता तर दुसरीकडे डोळे भरून अंतिम प्रवासाला निघालेल्या आपल्या बापाच्या अर्थीला पाहत निशा परीक्षेला जाण्यासाठी मोटारसायकलवर बसली होती. वेळेत परीक्षा केंद्रावर पोहोचून निशाने आपला पहिला पेपर दिला.

निशाच्या या धाडसाची चर्चा संपूर्ण गावभर आहे. 'आमच्या मुलीने जे केलं, ते खरोखर प्रेरणादायी आहे. वडिलांच्या स्वप्नांना ती खऱ्या अर्थाने न्याय देत असल्याची प्रतिक्रिया तिच्या कुटुंबीयांनी दिली. निशाच्या जिद्दीला शिक्षक, परीक्षाकेंद्रावरील कर्मचारी आणि परीक्षेसाठी आलेल्या इतर विद्यार्थ्यांनीही कौतुकाने शुभेच्छा दिल्या. हे उदाहरण सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे की कोणत्याही परिस्थितीत शिक्षणाला महत्त्व द्यावे. निशाने दाखवलेला आत्मविश्वास आणि कर्तव्यभावना तिला भविष्यात नक्कीच यशस्वी करेल, असा विश्वास साऱ्यांना आहे.

# डोंबिवलीत दुकानाच्या नावाची पाटी गुजराती भाषेत

## महाराष्ट्रात गुजराती भाषेत नामफलक लावलाच कसा?

■मुंबई । प्रतिनिधी :

राज्यातील सर्व दुकानं आणि आस्थापनांचे नामफलक ठळकपणे मराठी भाषेत असावेत असा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. राज्यभरात हा नियम लागू होतो. दुकानांवर ठळक अक्षरात मराठीतच नाव असण बंधनकारक आहे.

डोंबिवलीत मात्र, एका दुकानावर चक्क गुजराती भाषेत नामफलक लावण्यात आले आहे. महाराष्ट्रात गुजराती भाषेत नामफलक लावलाच कसा? गुजराती भाषेत नामफलक लावणाऱ्या दुकानदारावर कारवाई होणार का? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.



**शासन व्यवहारात मराठी भाषेचा वापर करण्याची संधी**

राज्य सरकारमधील सर्व कामकाज मराठीतून व्हावे यासाठी राज्य शासनाने एक कडक निर्णय जारी केला आहे. मराठीची सक्ती करणाऱ्या या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे बंधन हे राज्य सरकारमधील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर असणार आहे. शासन व्यवहारात मराठी भाषेचा वापर सुरू होऊन ५० वर्षांहून अधिक काळ झाला असला तरी अनेक ठिकाणी इंग्रजीचा वापर केला जात असल्याने शासनाने हा मराठी सक्तीचा निर्णय घेतलेला आहे. या निर्णयानुसार यापुढे प्रत्येक विभागाकडून शंभर टक्के काम मराठीत करण अपेक्षित आहे. जे अधिकारी, कर्मचारी मराठी भाषेचा वापर करण्यास टाळाटाळ करतील त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई केली जाणार आहे.

मुंबईसह राज्यातील इतर महापालिकांप्रमाणे कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील सर्व दुकाने आणि आस्थापनांचे नामफलक मराठी भाषेत लावण्यात यावेत असे निर्देश पालिकेने दिले होते.

त्यामुळे महापालिका क्षेत्रातील सर्व दुकाने आणि आस्थापनांना आपले नामफलक मराठी भाषेत लावणे बंधनकारक आहे. मात्र, असे असताना डोंबिवली मधील प्रसिद्ध सावरकर रोडवर एका दुकानदाराने नियम मोडत चक्क गुजराती भाषेतील पाटी लावली आहे. त्यामुळे पालिका प्रशासन आणि आयुक्त करावाई करणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# प्रेमप्रकरणातून हत्या, नातेवाईकांनी आरोपीच्या घरासमोरच मृतदेह जाळला

■धुळे । प्रतिनिधी :

जिल्ह्याच्या शिरपूर तालुक्यातील उमर्दा येथील ४ युवक काळापाणी गावांत आपल्या मैत्रिणींना भेटण्यासाठी गेले असता काळपाणी गावातील गावकऱ्यांनी या चौघा युवकांना संपूर्ण रात्रभर एका घरात डांबून ठेवले व त्यांना जबर मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली. या मारहाणीत एका युवकाचा जागीच मृत्यू झाला आहे. सदर घटनास्थळावरून युवकाला एका नाल्यात फेकून दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर मृत व्यक्तीच्या नातेवाईकांनी मृतदेह काळापाणी गावात नेऊन मारहाण करणाऱ्या आरोपींच्या घरासमोरच त्याच्यावर अंत्यविधी केले. तसेच, आरोपीच्या घरांची तोडफोड देखील करण्यात आली आहे. याप्रकरणी, पोलिसांनी ७ जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करत एकास अटक केली आहे. उमर्दा गावातील २० वर्षीय युवक कमलसिंग पावरा आपल्या मित्रांसोबत काळापाणी गावात आपल्या मैत्रिणीला भेटण्यासाठी गेला असता गावातील त्या मुलीच्या नातेवाईकांना संशय आल्याने त्यांनी या चारही तरुणांना एका घरात डांबून ठेवले. त्यानंतर,या चौघांना रात्रभर बेदम मारहाण करण्यात आली व त्यानंतर उमर्दा गावातील ग्रामस्थांना यासंदर्भात माहिती दिली.



आपल्या मुलांना येथून सुखरूप घेऊन जायचं असेल तर प्रत्येकी पाच हजार रुपयाची मागणी काळपाणी गावातील नागरिकांनी केली. त्यानंतर गावातील काही लोकांनी मध्यस्थी करत यापैकी तीन तरुणांची सुटका करून घेतली व कमलसिंग पावरा याच्यासंदर्भात विचारले असता तो रात्रीच येथून पळून गेल्याचे गावकऱ्यांनी सांगितले. या घटनेनंतर उमर्दा गावातील नागरिकांनी व नातेवाईकांनी कमलसिंग पावराचा शोध घेतला असता, तो दोन्ही गावच्या मध्ये असलेल्या एका नाल्यामध्ये मृत अवस्थेत आढळून आला. दरम्यान, नातेवाईकांनी त्याची पाहणी केली असता कमलसिंग पावरा याला बेदम मारहाण करण्यात आली होती. या मारहाणीतच त्याचा मृत्यू झाला व नंतर त्याला या नाल्यात फेकून दिलाचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

**७ जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल**

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच शिरपूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जयपाल हिरे व यांच्या पथकाने लागलीच घटनास्थळी धाव घेत कमल सिंग पावरा याचा मृतदेह पुढील कारवाईसाठी ताब्यात घेत शिरपूर येथे पाठवला. कमल सिंग पावरा याच्या मृतदेहावर शवविच्छेदन झाल्यानंतर उमर्दा गावातील संतप्त नातेवाईकांनी कमल सिंग पावराचा मृतदेह थेट काळापाणी गावात नेला. त्यानंतर, त्याला मारहाण करण्यात आलेल्या संशयित आरोपींच्या घरासमोरच त्याच्या पार्थिवावर अंत्यविधी करण्यात आला. यावेळी, संतप्त नातेवाईकांनी संशयित आरोपींच्या घराची तोडफोड करत नुकसान देखील केले आहे.या संपूर्ण प्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात अखेर खुनाचा गुन्हा दाखल झाला व पोलिसांनी आपली तपासाची चक्र फिरवत ७ आरोपींपैकी एका आरोपीला ताब्यात घेत इतर आरोपींचा शोध सुरू केला आहे.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# डॉलरचे वर्चस्व वाढतेच कसे?

डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य कमी होताना दिसल्यावर 'डॉलर वाढतो आहे' असे विश्लेषण करण्यात आले. ही स्थिती उद्भवली ती नेमकी, डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर? मग, 'नेतृत्व मजबूत म्हणून चलनही मजबूत' असे काही असते का? की आणखी निराळी कारणे आहेत? ती कारणे नेमकी काय? डोनाल्ड ट्रम्प यांचा गेल्या नोव्हेंबरमधील अमेरिकी राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीतील विजय निर्णायक आणि व्यापक होता. त्यांच्याकडे अर्थातच व्हाइट हाऊसवरील नियंत्रण आहेच पण आता त्यांच्या पक्षाचे दोन्ही प्रतिनिधीगृहांवर म्हणजेच कनिष्ठ सभागृह (हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह्ज) आणि वरिष्ठ सभागृह (सेनेट) यांवर बहुमत आहे. याला 'गव्हर्निंग ट्रायफेक्टा' म्हणतात, त्यावर वर्चस्व असणे ही राष्ट्राध्यक्षांना आपली धोरणे विनासायास राबवण्यासाठी आदर्श स्थिती मानली जाते. दुसऱ्यांदा अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर अवघ्या तीन आठवड्यांत त्यांनी जवळपास ६४ कार्यकारी आदेश जारी करून आपल्या वाढलेल्या प्रभावाचा उपयोग केला आहेच. २०१७ मध्ये सुरू झालेल्या त्यांच्या पहिल्या कार्यकाळाच्या तुलनेत, या वेळी त्यांना सर्वोच्च न्यायालयातही परंपरावादी आणि रिपब्लिकन पक्षाकडे झुकणाऱ्या न्यायाधीशांचे दोनतृतीयांश बहुमत अशी आणखी एक जमेची बाजू मिळालेली आहे. उदाहरणार्थ, अमेरिकेत जन्म झाला असल्यास आपोआप नागरिकत्व मिळण्याची तरतूद (जन्मसिद्ध नागरिकत्व) समाप्त करण्याच्या ट्रम्प यांच्या वचनाची पूर्तता करताना हे न्यायालयीन पाठबळ महत्त्वाचे ठरू शकते. नागरिकत्वाच्या तरतुदींत फेरफार फक्त कार्यकारी आदेशाने करता येणार नाही, आणि त्यासाठी घटनादुरुस्तीची गरज भासू शकते, या दुरुस्तीलाही अमेरिकेच्या संघराज्यीय सर्वोच्च कोर्टात आव्हान दिले जाऊ शकते. तरीसुद्धा, ट्रम्प यांची लोकप्रियता आता निवडणुकीच्या वेळेपेक्षा जास्त आहे, आणि ती त्यांना मत न दिलेल्यांपैकी दहा टक्के लोकांमध्येही वाढली आहे. याचा अर्थ असा की, ज्यांनी त्यांना मतदान केले नाही, तेही आता त्यांच्या धोरणांचे समर्थन करत आहेत. या धोरणांमध्ये व्यापार भागीदारांविरुद्ध टॅरिफ कारवाई (आयातशुल्क वाढवणे), बेकायदा स्थलांतरित नागरिकांवर कठोर कारवाई, युक्रेन व इतर युद्धांमधून माघार, नाटो मित्रदेशांकडून अधिक आर्थिक योगदानाची मागणी आणि एकूण सरकारचाच आकार, व्याप व खर्च कमी करणे, यांचा समावेश आहे. ट्रम्प यांनी भारतासह अनेक देशांना धमकीच दिली आहे की, अमेरिका 'जशास तसे' आयात शुल्क वाढवेल. याला प्रत्युत्तर म्हणून, भारताने तत्काळ अमेरिकन बर्बन व्हिस्कीवरील आयात शुल्क १५० टक्क्यांवरून १०० टक्क्यांपर्यंत कमी केले आहे. हार्ले डेव्हिडसन मोटरसायकलींवरील शुल्क यापूर्वीच कमी करण्यात आले होते. भारताची अमेरिकेशी व्यापारी तूट सुमारे ३० अब्ज डॉलरची आहे, आणि ट्रम्प यांना ती तूट कमी करायची आहे. एफ ३५ आणि इतर लढाऊ वाहने खरेदी करण्याचा विचार सुरू आहे, हेदेखील अमेरिकन भावना शमवण्यासाठी उपयुक्त ठरू शकते. मात्र राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या काही इच्छा परस्परविसंगत वाटतात. एका बाजूला, व्यापार तूट कमी करणे आणि डॉलरचे मूल्य कमी करणे, यातून अमेरिकन निर्यात आणि नोकऱ्या वाढवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. दुसऱ्या बाजूला, ते डॉलर मजबूत करून जागतिक वर्चस्व टिकवून ठेवू इच्छितात. त्यांनी भारतासह ब्रिक्स देशांना धमकी दिली आहे की, त्यांनी जर डॉलरशिवाय अन्य चलनात व्यापार करण्याचा विचार केला, तर १०० टक्के आयात शुल्क लावले जाईल. म्हणजे ट्रम्प यांना डॉलर व्यापारासाठी कमजोर हवा, पण भूराजकीय रणनीतीसाठी मजबूत डॉलर हवा- यात विरोधाभास आहे. तरीसुद्धा वास्तव असे आहे की, डॉलर निर्देशांक (डीएक्सवाय) गेल्या २५ वर्षांतील उच्चांकाच्या जवळ आहे. डॉलरच्या सामर्थ्याचे आणि वर्चस्वाचे खरे स्रोत काय आहेत? हे उच्चांक राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना लाभलेल्या राजकीय पाठिंब्यामुळे आणि लोकप्रियतेमुळे होताहेत का? किंवा गव्हर्निंग ट्रायफेक्टावर त्यांचे वर्चस्व आहे, याचा तो परिणाम आहे का? तसे नाही. 'मजबूत सरकार, म्हणून मजबूत चलन' असा कोणताही थेट संबंध जोडता येणार नाही. मुळात, ट्रम्प यांच्या वर्चस्वासाठी ट्रायफेक्टाही पुरेसे नाही कारण सेनेटमध्ये कायदा मंजूर करण्यासाठी ६० टक्के बहुमत आवश्यक आहे, ते ट्रम्प यांच्याकडे सध्या नाही. रिपब्लिकन पक्षातील काही जण ट्रम्प यांच्या काही धोरणांना विशेषतः सरकारकडून लाभांमध्ये कपात आणि सरकारचा आकार कमी करण्याच्या योजनांना संमिश्र प्रतिसाद देत असल्याचे गेल्या काही दिवसांत दिसलेले आहे. मग डॉलरच्या वाढत्या वर्चस्वामागचे खरे कारण काय आहे? पहिले कारण म्हणजे दुसरे कोणतेही चलन डॉलरला स्पर्धक म्हणून सक्षम नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर संकुचित झालेला पाउंड स्टर्लिंग, १९९९ मध्ये जन्मलेले युरो किंवा चिनी युआन, यापैकी कोणतेही चलन डॉलरच्या श्रेष्ठतेच्या जवळपासही नाही. जागतिक व्यापारातील अमेरिकेचा वाटा फक्त ११ टक्के आहे. परंतु अमेरिकेची अर्थव्यवस्था जागतिक एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या (जगाच्या 'जीडीपी'च्या) एकचतुर्थांश आहे आणि ती सर्वात मोठी आहे. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प व्यापार तुटीबद्दल (व्यापार अधिशेषाबद्दल) अस्वस्थ आहेत, कारण ती सुमारे एक ट्रिलियन डॉलर आहे. त्याच वेळी, चीनलादेखील एक ट्रिलियन डॉलरची व्यापारी तूट आहे, त्यातील दोनतृतीयांश तूट अमेरिकेशीच आहे. भारतासह अनेक देश अमेरिकेशी व्यापारी तूट किंवा अधिशेष ठेवतात. गोम अशी की, देशोदेशींच्या या 'अधिशेष डॉलर'चे किंवा अन्य देशांशी जितकी व्यापारी तूट आहे त्याचे रूपांतर परकीय चलन साठ्यात होते. जगभरातील साठ्यांपैकी ६० टक्के डॉलरमध्ये आहेत, म्हणजेच पर्यायाने अमेरिकन सरकारी रोख्यांमध्ये. हेच डॉलरचे वर्चस्व असण्याचे खरे कारण आहे.

**ज्याचा धर्म त्याने पाळावा, असे छत्रपती शिवरायांनी सांगितले आहे. शिवरायांनी संघर्ष केला तो मोगल सत्तेच्या जुलुमाविरुद्ध. तरीही छत्रपतींचे प्रतीक धार्मिक विद्वेष पसरवण्यासाठी, राजकारणासाठी वापरले जाते. आज गरज आहे ती शिवरायांनी ३५० वर्षांपूर्वी दिलेल्या आज्ञेला अनुसरून महाराष्ट्र घडविण्याची. शिवरायांची सर्वसमावेशक वृत्ती अंगी बाणवण्याची.**



## कुळवाडीभूषण, रयतेचा राजा

दोन नोव्हेंबर १६६९ च्या एका पत्रात रघुनाथ पंडितरावांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या आज्ञेचा उल्लेख केला आहे. ''श्रीमंत महाराज राजे यांनी ज्याचा जो धर्म त्याचा त्यांनी करावा, यात कोणी बखेडी करू नये असे फर्मावले आहे.'' असे या आज्ञेचे स्वरूप आहे. कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांनी शिवाजी कोण होता? या आपल्या पुस्तकाच्या आणि विविध व्याख्यानांच्या माध्यमातून खऱ्या इतिहासाचे दाखले देत लोकांना छत्रपती शिवरायांचे 'रयतेचा राजा' हे रूप सांगितले. ज्याचा जो धर्म असेल त्यांनी तो करावा, त्यात भांडणे निर्माण करू नयेत, असा स्पष्ट आदेश देणारे सहिष्णु शिवाजी महाराज म्हणूनच महाराष्ट्रातील अठरापगड जातींना, हिंदू- मुस्लिमांना आपलेसे वाटतात. नुकतीच त्यांची ३९५ वी जयंती महाराष्ट्रात आणि जगभरातील मराठी माणसांनी साजरी केली. हे कोणी फरमान काढले म्हणून झाले नाही, तर शिवाजी महाराजांबरोबर मराठी माणसांचे थेट भावनिक नाते आहे. म्हणूनच दरवर्षी १९ फेब्रुवारीला उत्साहात महाराजांची जयंती साजरी होते. त्यांची संपूर्ण कारकीर्द ही हिंदू-मुस्लिम सर्व जाती धर्मातील स्त्रियांचा सन्मान आणि आदर करण्याची आहे. हिंदू-मुस्लिम सर्वांच्या धार्मिक स्थळांचा आणि ग्रंथांचा श्रद्धेने संरक्षण करण्याचा विचार ते देतात. राजे स्वतः हिंदू होते, धर्मश्रद्ध होते. पण त्यांनी आपल्या धर्मातील माणसाला एक वागणूक आणि दुसऱ्या धर्मातील माणसाला दुजी वागणूक कधीही दिली नाही. परंतु आज शिवाजी महाराजांच्या विषयी मराठी माणसांच्या मनात असणाऱ्या भावना आपल्या राजकारणासाठी वापरल्या जात आहेत. आपल्या धर्मा इतकाच इतरांचा धर्म श्रेष्ठ आणि उच्च आहे. उपासना पद्धती वेगवेगळ्या असल्या तरी त्याचा उद्देश एकच आहे, हे महत्त्वाचे तत्त्व शिवाजी महाराजांनी मांडले. जुलमी, शोषण करणाऱ्या मोगल सत्तेविरुद्ध छत्रपती शिवाजी महाराजांनी आणि स्वराज्य संरक्षक संभाजी महाराजांनी सातत्याने उभा संघर्ष केला. त्यांनी स्वराज्य उभारले ते जुलमी सत्तेविरुद्ध, मोगल हे मुस्लिम होते म्हणून नव्हे, हे स्पष्ट असताना धर्मांध, जातीअंत राजकारणासाठी शिवाजी महाराजांची मोठमोठी स्मारके उभी करण्याच्या घोषणा करायच्या, या ना त्या मार्गाने निवडून आलेल्या आपल्या आमदार- खासदारांना महाराजांची जयंती त्यांना हवी तशी (मुस्लिमविरोधी) साजरी करण्यासाठी पैसा पुरवायचा, हे होत आहे. ज्या प्रवृत्तीने शिवाजी महाराजांच्या कार्यकालात त्यांना विरोध केला तेच आज त्यांचा वापर राजकारणासाठी करत आहेत. अनैतिहासिक सिनेमे काढून ते सिनेमे फुकट दाखविण्याची व्यवस्था करून आपले घाणेरडे राजकारण साधण्यासाठी शिवाजी आणि संभाजी महाराज मुस्लिमविरोधी होते, हे दाखवण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. महाराष्ट्र धर्म संपवणाऱ्या राजकारणाविरुद्ध संघटित झालेल्या महाराष्ट्रीयन लोकांमध्ये पुन्हा एकदा फूट पाडून आपल्या राजकारणासाठी भावनिक आवाहन करून त्यांना आपल्याकडे ओढण्याचा आक्रमकपणे प्रयत्न केला जात आहे. या पद्धतीने आपल्या मुद्द्यावर लोक आपल्या बाजूने आल्याची खात्री होईपर्यंत मुंबईसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे लांबणीवर टाकल्या आहेत. कार्पोरेटच्या हिताचे राजकारण करणाऱ्या, हुकूमशाहीकडे वाटचाल सुरू असणाऱ्या राजकारण्यांनी शिवाजी महाराज, संभाजीराजे यांचा प्रतीक म्हणून आक्रमकपणे वापर सुरू केला आहे. जगण्याचे प्रश्न सोडविण्यामध्ये अपयशी ठरलेली मंडळी आता लोकांच्या भावनांशी खेळत आहेत. महागाई, बेकारी, शिक्षणाचे बाजारीकरण, आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा, एसटी महामंडळासह सर्वच महामंडळांचे चाललेले वाटोळे, आर्थिक दिवाळखोरी या सगळ्यामुळे वाढत असलेल्या क्षोभावर भावनिक उन्मादाचा उतारा देण्याचा प्रयत्न सुरू आहे. अरबी समुद्रातील शिवस्मारकाविषयी बोलले जात नाही. महाराजांचा अलीकडे मालवण इथे जो पुतळा पडला त्यातील भ्रष्टाचाराचे काय झाले? हे सांगितले जात नाही. आग्रा येथे स्मारक उभारण्याच्या घोषणा केल्या जातात. पण पुढे काही होत नाही. मराठी माणसांच्या हृदयाजवळ असणाऱ्या शिवाजी महाराजांचा आपल्या राजकारणासाठी वापर करणाऱ्या प्रवृत्तीचा कावेबाजपणा मराठी माणसाने वेळीच ओळखावा आणि जगण्याच्या समस्यांवर प्रश्न विचारण्यासाठी सज्ज व्हावे. स्त्रियांना सुरक्षा आणि सन्मान देणे, धार्मिक सलोखा राखणे, भ्रष्टाचार करणाऱ्यांना वेळीच शिक्षा देणे आवश्यक आहे. अठरापगड जातींच्या आणि सर्व जाती-धर्मातील मराठी माणसाने शिवाजी महाराजांनी ३५० वर्षांपूर्वी केलेल्या आज्ञेनुसार महाराष्ट्र घडवावा. महाराष्ट्र धर्माप्रमाणे आपले वर्तन ठेवणे हीच महाराजांना कृतिशील अभिवादन असेल.

## 'मतदान निधी'चे पडसाद



अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे दुसऱ्यांदा हाती घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी निर्णयांचा धडाका लावला आहे. 'अमेरिका फर्स्ट' म्हणजेच आपल्या देशाला प्राधान्य देण्याचे धोरण हे त्यामागील सूत्र आहे. त्यानुसार कररचनांबाबतचा निर्णय घेऊन व्यापारयुद्ध छेडल्यानंतर ट्रम्प प्रशासनाने अमेरिकेकडून विविध देशांना दिल्या जात असलेल्या निधीकडे मोर्चा वळविला आहे.

निवडणूक आणि राजकीय प्रक्रिया भक्कम करण्यासाठी अनेक देशांना निधी पुरविणे बंद करण्याचा निर्णय हा त्याचाच एक भाग. कार्यक्षमता वाढविण्यासाठी ट्रम्प यांनी सुरू केलेल्या मंत्रालयाचे प्रमुख एलन मस्क यांनी तो जाहीर केला असून, सुमारे ४८.६० कोटी डॉलरच्या अनुदानाला कात्री लावण्यात आली आहे. ट्रम्प प्रशासनाच्या आयातशुल्कांबाबतच्या निर्णयाप्रमाणेच याही निर्णयाचा फटका भारताला बसला आहे; कारण भारतासाठी असलेल्या २.१० कोटी डॉलरचा समावेश त्यात आहे. अमेरिकेतील बेकायदा भारतीय निर्वासितांना मायदेशी परत पाठविण्यापासून आयातशुल्क वाढविण्यापर्यंतच्या निर्णयाचे जसे राजकीय पडसाद देशात उमटले, तसेच ते या निर्णयानंतरही उमटत आहेत.

बेकायदा निर्वासितांची परत पाठवणी बेड्या बांधून केली जात असल्याने आणि त्यांचे विमान अमृतसरला उतरविले जात असल्याने विरोधकांनी सत्ताधारी भारतीय जनता पक्षाला लक्ष्य केले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ट्रम्प हे एकमेकांना परस्परांचे मित्र म्हणवत असताना, ट्रम्प प्रशासन भारताला अशी वागणूक का देत आहे, असा प्रश्नही उपस्थित केला गेला. या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांच्या निर्णयाने भाजपला विरोधकांवर हल्ला करण्याची संधी मिळाली आहे. काँग्रेसप्रणित संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या (यूपीए) कार्यकाळात अमेरिकेकडून निधी मिळविण्यात आला आणि त्याद्वारे भारतीय यंत्रणांत बाह्य शक्तींचा शिरकाव होऊ दिला, असा आरोप भाजपने केला आहे. अमेरिकी उद्योगपती जॉर्ज सोरोस आणि काँग्रेस यांच्यात गुळपीठ असल्याचा आरोप भाजपने यापूर्वीही केला होता. आताचे प्रकरणही त्याच्याशी भाजपने जोडले आहे.

निवडणूक आयोगाचे तत्कालीन आयुक्त एस. वाय. कुरेशी यांनी आरोप खोडून काढले आहेत. मात्र, २०१२मध्ये याबाबत करार झाल्याची कबुली त्यांनी दिली आहे. 'इंटरनॅशल फाउंडेशन फॉर इलेक्टोरल सिस्टीम्स' या संस्थेशी झालेला हा करार प्रामुख्याने प्रशिक्षणाबाबतचा होता, असा खुलासा कुरेशी यांनी केला आहे. आरोप-प्रत्यारोपाच्या या साखळीनंतर गरज आहे, ती या प्रकरणी नेमके काय घडले हे सांगण्याची. याबाबत पारदर्शक चौकशी व्हावी, यासाठी भाजपने पाऊल उचलायला हवे.

## यावर्षीचा 'कोरडवाहू' अर्थसंकल्प



**मध्यमवर्गाला दिलेल्या करसवलतींमुळे या वेळच्या अर्थसंकल्पाचा गाजावाजा झाला खरा, पण शेतकऱ्यांसाठी त्यात काहीच दिलासादायक नव्हते, याची चर्चाही झाली नाही.**

कृषी क्षेत्राला विकासाचे पहिले इंजिन म्हणत, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी १ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रधानमंत्री धन धान्य योजना आणि इतर योजनांची घोषणा केली. कमी उत्पादन आहे अश्या १०० जिल्ह्यांतील १.७ कोटी शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा होईल असे म्हटले गेले. केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले की अर्थसंकल्पामुळे शेती क्षेत्राच्या सर्वांगीण विकासला मदत होईल. मात्र प्रत्यक्षात या विकासाच्या इंजिनाला निधीची उर्जा मिळालीच नाही. शेतीसाठी लागणाऱ्या वस्तूंच्या व खतांच्या किमतींमध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता या अर्थसंकल्पातून दिसते आहे. अर्थसंकल्पातील शेतकरी हिताच्या महत्वाच्या १० योजना शेतकऱ्यांसाठी फायद्याच्या ठरतात की नेहमीप्रमाणे पालापाचोळ्यासारख्या हवेत उडून जातात हे पाहण्यासारखे आहे.

वाढत्या महागाईबरोबर शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही गगनाला भिडत आहे, शेतकऱ्यांचे उत्पन्न मातीमोल ठरत आहे. त्यांच्या मालाला चांगला भाव मिळत नाही. निर्यात धोरणाचा अभाव दिसून येत आहे कारण ज्या काळात शेतकऱ्याचा माल बाजारात आणला जातो त्या काळात सरकार विदेशी मालाची आयात करून, स्वदेशी मालाची निर्यात बंदी करते. या असल्या धोरणामुळे शेतकऱ्यांवर आपला माल रस्त्यावर फेकून देण्याची वेळ येते कारण तो माल बाजारात नेला तर वाहतूक खर्च आणि अडतीचा खर्च शेतकऱ्याला परवडत नाही. मोठा गाजावाजा करत ज्या १० योजना जाहीर केल्या, त्यामधील कापूस उत्पादकता मिशन पाच वर्षांसाठी राबवण्यात येणार आहे पण या योजनेसाठी केवळ ५०० कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या मिशनमधून कापूस उत्पादक शेतकऱ्यांना अद्ययावत तंत्रज्ञान पुरवले जाणर आहे आणि यातून उत्पादकता वाढीवर लक्ष केंद्रित केले जाणार असल्याचे म्हटले गेले आहे. शेतकऱ्यांना लांब धाग्याच्या कापसाचे वाण या योजनेतून पुरवले जाणार आहे. कापूस उद्योगासाठी 'फाइव्ह एफ' धोरण राबवले जाणार आहे. यातून कापड उद्योगाला गुणवत्तापूर्ण कापसाचा सुरळीत पुरवठा करण्यावर जोर दिला जाणार आहे. या योजनेंतर्गत एवढे सगळे उदिष्ट समोर ठेवले आहे, पण निधी मात्र अत्यंत तोकडा दिला गेला आहे. आणि या ५०० कोटी रुपयामध्ये हे मिशन पूर्ण देशभरामध्ये कसे राबवले जाईल हे येणाऱ्या काळात कळेलच.

कडधान्याची आयात कमी करण्यासाठी व आत्मनिर्भर होण्यासाठी सहा वर्षांची योजना जाहीर केली आहे. यात तूर, उडीद, मसूर उत्पदान वाढवण्याची घोषणा आहे. पुढील चार वर्षे शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या तूर, उडीद आणि मसूरची पूर्ण खरेदी नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यमातून केली जाणार आहे. परंतु या योजनेसाठी केवळ एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तर दुसरीकडे तूर, हरभरा आणि वाटाणा अशा कडधान्यांनी आयातीचे नवे विक्रम केले आहेत. मग अशा प्रकारे आयात होत राहिली आणि शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव नाही मिळाला तर मग आपण कडधान्य उत्पादनात कसे बरे आत्मनिर्भर होऊ शकतो? मागास १०० जिल्ह्यांसाठी पंतप्रधान धनधान्य योजना जाहीर केली आहे. या योजनेसाठी केवळ १०० कोटींचा निधी जाहीर केला आहे, म्हणजेच एका जिल्ह्यासाठी एक कोटी रुपये मिळण्याची शक्यता आहे. या योजनेचा एक कोटी ७० लाख शेतकऱ्यांना लाभ देण्यात येईल असे उदिष्ट ठेवले गेले आहे. या योजनेसाठी निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये उत्पादकता वाढवणे, विविध पिकांची लागवड करणे, पीक पद्धतींमध्ये बदल करणे, सिंचन सुविधेत वाढ करणे, दीर्घ व अल्प मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देणे या सगळ्या उद्दिष्टांची बोळवण फक्त १०० कोटींवर करण्यात आली आहे.

राष्ट्रीय तेल मिशन योजनेला यावर्षीच्या अर्थसंकल्पातून बगल दिल्याचे दिसून येत आहे. निधीच नसेल तर आपण राष्ट्रीय तेलबिया मिशन पूर्ण करून खाद्यतेल उत्पादनात कधी आत्मनिर्भर होणार आणि खाद्यतेल आयात कशी आणि कधी कमी करणार ?

रासायनिक खतांच्या अनुदानामध्ये २६,५००.८५ कोटी रुपयांची कपात करण्यात आली आहे. मागील आर्थिक वर्षात १,८३,००३.२९ कोटी च्या सुधारित अंदाजावरून या वर्षी १,५६,५०२.४४ कोटी रुपयांच्या अनुदानाची तरतूद यावर्षी करण्यात आली आहे. म्हणजे २६,५००,८५ कोटी रासायनिक खतांच्या अनुदानात कपात करण्यात आली आहे. यामुळे खत अनुदानात घट होऊन रासायनिक खतांच्या किमती आणखी वाढण्याची चिन्हे स्पष्ट होताना दिसत आहेत.

या व्यतिरिक्त शेतकऱ्यांना निवडणूक काळात पीएम किसान सन्मान निधीमध्ये वाढ करण्याची आशा दाखवण्यात आली होती. त्यामुळे शेतकऱ्यांना सरकारकडून ती अपेक्षा होती, त्यांना दुसरी अपेक्षा होती ती संपूर्ण कर्जमाफीची. ती या अर्थसंकल्पातून पूर्ण झालेली दिसत नाही. तिसरी अपेक्षा होती ती हमीभावाबद्दल ठोस उपाययोजना करण्याची आणि चौथी सिंचन सुविधेत सुधारणा करून भरीव निधीची.

२०२५ च्या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रातील महत्वाच्या योजनांचा निधी कमी करण्यात आलेला दिसून येत आहे. हा अर्थसंकल्प शेतकऱ्यांसाठी कोरडवाहू अर्थसंकल्प आहे, ज्यातून शेतकऱ्यांना केवळ निराशाच हाती आलेली दिसून येते.

# सेमीकंडक्टर क्षेत्रात स्वदेशी शक्ती!

**सेमीकंडक्टर चिपसाठी सध्याच्या घडीला इतर देशांवर अवलंबून असलेला भारत स्वदेशी सेमीकंडक्टर चिप विकसित करण्याच्या दिशेने वेगानं वाटचाल करतोय. भारत दरवर्षी सेमीकंडक्टर चिपच्या आयातीवर कोट्यवधी रुपये खर्च करतो. खासगी उत्पादनांकरिता देशातील पहिली सेमीकंडक्टर चिप या वर्षाच्या अखेरपर्यंत येण्याची चिन्हे आहेत. इस्रो आणि आयआयटी मद्रासने मिळून अंतराळ मोहिमांसाठीही एक स्वदेशी सेमीकंडक्टर चिप विकसित केली आहे. सेमीकंडक्टर क्षेत्रातली ही स्वदेशी शक्ती भविष्यात नवा इतिहास रचणार आहे.**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) आणि भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) मद्रास यांनी संयुक्तपणे शक्ती तंत्रज्ञानावर आधारित एक स्वदेशी सेमीकंडक्टर (अर्धसंवाहक) चिप विकसित केली आहे. या स्वदेशी चिपला इंडिजिनस आरआयएससीव्ही कंट्रोलर फॉर स्पेस ॲप्लिकेशन्स (आयआर आयएस-आयरिस) असं नाव देण्यात आलं आहे. एअरोस्पेस दर्जाची ही पावरफूल आयरिस चिप प्रामुख्यानं अंतराळातील उपकरणे आणि सिस्टिमकरीता डेव्हलप करण्यात आली आहे. ओझोनच्या कवचामुळं पृथ्वीवर राहून आपल्याला रेडिएशन किंवा त्याच्या तीव्रतेची कल्पना येणं अशक्य आहे. रेडिएशनच्या तीव्र माऱ्याला सहन करत ही चिप अंतराळातील उपकरणांना शक्ती देईल.

थिरुवनंतपुरम येथील इस्त्रो इनर्शियल सिस्टम्स युनिटच्या सहकार्यानं ही चिप चंदीगड येथील सेमीकंडक्टर प्रयोगशाळेत बनवण्यात आली असून कर्नाटकातील टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टम्समध्ये पॅक केली आहे. या चिपचं डिझाइन, फॅब्रिकेशन, पॅकेजिंग, मदरबोर्ड डिझाइन, चिप असेंब्ली आणि बूटिंग हे सर्व भारतातच झालं आहे. पूर्णपणे भारतीय संसाधनांचा वापर करून बनवलेली ही स्वदेशी चिप सेमीकंडक्टर डिझाइन आणि फॅब्रिकेशनमधील मेक इन इंडिया प्रकल्पातील मैलाचा दगड आहे.

इस्त्रो आणि आयआयटी मद्रासनं याआधी २०१८ मध्ये रिमो, २०२० मध्ये मौशिक चिप विकसित केली होती. शक्ती या श्रृंखलेतील तिसरी कडी आहे. आयआयटी मद्रासच्या रिकॉन्फिगरेबल इंटेलिजेंट सिस्टम्स इंजिनिअरिंग (आरआयएसई) च्या ग्रुप मेंबर्सनी तयार केलेला हा एक १८० नॅनोमीटर (६४-बिट) तंत्रज्ञानावर आधारीत ओपन सोर्स प्रोसेसर आहे, ज्याचं स्वतःचं सॉफ्टवेअर प्लॅटफॉर्मदेखील आहे. सद्यस्थितीत शक्ती प्रोसेसरचे ३ मुख्य प्रकार आहेत, ज्यात बेस क्लास प्रोसेसर, मल्टीकोर प्रोसेसर आणि प्रायोगिक प्रोसेसर यांचा समावेश आहे. हे तिन्ही प्रोसेसर वेगवेगळ्या कामांसाठी डिझाइन केलेले आहेत.

प्रत्येकाची प्रोसेसिंग स्पीड, रेंज वेगवेगळी आहे. काही प्रोसेसर औद्योगिक वापरासाठी आहेत, काही प्रोसेसर भविष्यात संगणक आणि स्मार्टफोनमध्ये वापरले जातील. तर काही प्रोसेसर केवळ प्रयोगासाठी बनवले आहेत. केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाकडून या उपक्रमाला आर्थिक पाळबळ दिलं जात आहे. मायक्रोप्रोसेसर आधारित उत्पादनांच्या स्वदेशी तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देणं हे या उपक्रमाचं उद्दिष्ट आहे. शक्ती प्रोसेसरच्या बेस क्लावर आधारीत आयरिस चिपचा वापर प्रामुख्यानं आयओटी, संगणक प्रणाली आणि अंतराळ मोहिमांमध्ये केला जाऊ शकतो. या स्वदेशी चिपमुळे भविष्यातील भारताच्या अंतराळ मोहिमा आणखी प्रगत होतील, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

एकीकडं आयरिस चिपचं स्वागत होत असतानाच केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी परवा पत्रकार परिषद घेऊन सप्टेंबर किंवा ऑक्टोबर महिन्यात जगाला पहिली 'मेड इन इंडिया' सेमीकंडक्टर चिप मिळेल अशी घोषणा केली आहे. टाटा इलेक्ट्रॉनिक्स, पॉवरचिप सेमीकंडक्टर मॅन्युफॅक्चरिंग कॉर्पोरेशन (पीएसएमसी) सोबत भागीदारीमध्ये गुजरातच्या धोलेरा इथं देशातील पहिलं सेमीकंडक्टर फॅब बांधत आहे. याकरीता टाटाने ९१ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली असून १६० एकरवर हा प्लांट उभा रहात आहे. हा देशातील पहिला सेमीकंडक्टर प्लांट आहे. मार्च २०२४ मध्ये इथलं युनिट सुरू करण्यात आलं होतं. या प्लांटमधून २०२६ च्या अखेरीस देशातली पहिली सेमीकंडक्टर चिप उत्पादित होईल, असा अंदाज होता. परंतु सध्या या युनिटमध्ये ज्या गतीनं काम सुरू आहे, त्याकडं पाहता जगाला एक वर्ष आधीच मेड इन इंडिया सेमीकंडक्टर चिप्स मिळतील, असं दिसत आहे.

सेमीकंडक्टर चिप्सना सिलिकॉन चिप्स असंही म्हणतात. या चिप्स म्हणजे इलेक्ट्रॉनिक उत्पादनाचा मेंदू म्हणता येईल. एलईडी बल्बपासून ड्रोन, रॉकेट-विमान, क्षेपणास्त्रांपर्यंत आणि कारपासून ते मोबाईल, लॅपटॉप, टीव्ही, स्मार्ट वॉचपर्यंत सर्वच इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंची मेमरी ऑपरेट करण्याचं काम ही चिप करते. सध्याच्या घडीला तैवान, व्हिएतनाम, चीन, अमेरिका आणि जपान हे देश चिप संशोधन-निर्मितीत अग्रेसर आहेत. चीन तर प्रोसेसर चिप्स आणि सेमीकंडक्टरचा सर्वात मोठा निर्यातदार देश आहे.

दक्षिण कोरियाही वेगानं पुढं जात असून भारतानं आता कुठं या संशोधनात बाळसं धरलं आहे. जिथं तैवान, चीन, अमेरिकेच्या कंपन्या ३ किंवा ४ नॅनोमीटर तंत्रज्ञानावर आधारीत चिपचं उत्पादन करत असताना भारत १८० नॅनोमीटर तंत्रज्ञानावर आधारीत चिप बनवू लागला आहे. २० ते २५ नॅनोमीटर तंत्रज्ञानावर आधारीत चिप बनवणं हे पुढचं लक्ष्य असेल. इंडियन इलेक्ट्रॉनिक्स अँड सेमीकंडक्टर असोसिएशननुसार, भारताची सेमीकंडक्टर बाजारपेठ २०३० पर्यंत १०३.४ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे, यामुळं ४०० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त इलेक्ट्रॉनिक्स बाजारपेठेला बळकटी मिळेल.

मुळात सेमीकंडक्टर चिप बनवणं ही खूपच गुंतागुंतीची प्रक्रिया असते.




चिप बनवण्याच्या प्रक्रियेत ४००-५०० पार्यया असतात. यापैकी एकही पाऊल चुकलं तर कोट्यवधी रुपयांचं नुकसान होऊ शकतं. मायक्रोचिप बनवण्यासाठी लागणारा पॅलेडियम धातू काही निवडक देशांकडेच उपलब्ध आहे. रशिया हा पॅलेडियमचा सर्वात मोठा पुरवठादार देश आहे, अनेक कंपन्यांनी चिप डिझायनिंग तंत्रज्ञानाचे असंख्य पेटंट आपल्याकडं घेऊन ठेवल्यामुळं इतर देशांना संशोधनात अडचणी येतात.

भारतीय इंजिनिअर्स मोठ्या संख्येनं नामवंत आयटी आणि चिप उत्पादक कंपन्यांमध्ये कार्यरत असूनही या क्षेत्रात भारताला आजपर्यंत ठसा उमटवता आलेला नाही, हे त्यामागचं प्रमुख कारण सांगता येईल. काही निवडक देश व कंपन्यांचीच या क्षेत्रात मोनोपॉली दिसते. कोविड काळात चीननं मायक्रो चिप्ससाठी अनेक देशांना वेठीस धरलं होत. चिप संशोधन, डिझायनिंग आणि उत्पादन असे तीन स्तर या प्रक्रियेत आहेत. ज्या कंपन्यांमध्ये चिप्स तयार होतात त्यांना फॅब्रिकेशन किंवा फॅब्स म्हणतात. भारतात संशोधन आणि डिझाइनशी संबंधित काही कंपन्या अस्तित्वात असल्याने भारताने आता चिप उत्पादनावर लक्ष केंद्रित केलं आहे.

सध्या स्वदेशी रॉकेट, जीपीएस आणि इतर तांत्रिक उपकरणं चालवण्यासाठी भारताला परदेशी प्रोसेसरचा वापर करावा लागतो. त्याकरीता भारताला आपला बराचसा महत्त्वाचा डेटा त्या देशासोबत शेअर करावा लागतो. आपल्याकडं स्वदेशी प्रोसेसर असेल तर आपल्याला देशाच्या सुरक्षेशी संबंधित तंत्रज्ञान कोणासोबतही शेअर करावं लागणार नाही.

स्वदेशी प्रोसेसरवर आधारीत मेड इन इंडिया स्मार्टफोन, टीव्ही-लॅपटॉप, इलेक्ट्रिक वाहने आदींच्या किमती जवळपास निम्म्या होऊ शकतील. या वस्तूंच्या निर्यातीतून भारताला अब्जावधींचा नफा कमावता येईल. इंडिया सेमीकंडक्टर मिशनअंतर्गत भारतातील महाराष्ट्र, गुजरात आणि आसाममध्ये २.३६ लाख कोटींच्या गुंतवणुकीसह ६ प्लांट उभारले जात आहेत. टाटा, अदानी, सीजी पॉवर या भारतीय कंपन्या मायक्रॉन (अमेरिका), टॉवर सेमीकंडक्टर (इस्त्रायल), पीएसएमसी (तैवान), रेनेसास इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन (जपान), स्टार्स मायक्रोइलेक्ट्रॉनिक (थायलंड), केनेस सेमिकॉन आदी परदेशी कंपन्यांसोबत भागीदारीत सेमीकंडक्टर चिप उत्पादनांसाठी फॅब्रिकेशन प्लांट उभारत आहेत. या विविध प्लांटमधून दरवर्षी लाखो चिप्स उत्पादित होतील.

कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) तंत्रज्ञानामुळं सेमीकंडक्टर चिप्सचं महत्त्व आणखीनच वाढलं आहे. भविष्यात बहुतांश इलेक्ट्रिक उपकरणे एआयवर चालतील. त्याकरिता चिप उत्पादनातही आमूलाग्र बदल होत आहे. भारतानंही एआय धोरणाचा स्वीकार करून ५०० कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केली आहे. शक्ती चिपच्या आधारे सेमीकंडक्टर चिप निर्मितीत भारताने स्वावलंबनाच्या दिशेनं एक महत्त्वाचं पाऊल टाकलं आहे.

भारताकडे उच्च दर्जाचं सेमीकंडक्टर तंत्रज्ञान तयार करण्याची क्षमता असल्याचंच या चिपच्या निर्मितीवरून दिसून येतं. भलेही हे प्रोसेसर अद्याप पूर्णपणे विकसित झालेलं नाही, जे आपण ताबडतोब कॉम्प्युटर्स किंवा स्मार्टफोनमध्ये वापरू शकतो, पण ज्या वेगाने यावर संशोधन सुरू आहे ते पाहता तो दिवस दूर नाही जेव्हा भारताकडे स्वतःचा मायक्रो प्रोसेसरही असेल.

## पेरूचे आरोग्यदायी सरबत

**साहित्य :** एक पिकलेला पेरू, दोन चमचे साखर (चवीनुसार), अर्धा इंच अद्रकाचा (आलं) तुकडा, चवीनुसार मीठ, अर्धा चमचा लिंबाचा रस, एक ते दीड कप पाणी थंड पाणी

**कृती :** पिकलेला पेरू धुवून त्याची साल काढावी. पेरूच्या फोडी करून घ्याव्यात. यानंतर या फोडी मिक्सरच्या भांड्यात टाकाव्यात. सोबत अद्रक, मीठ, लिंबाचा रस व एक कप थंड पाणी टाकून मिक्सर फिरवावे. हे सर्व मिश्रण गाळून घ्यावे... तुमच्यासाठी ताजे थंडगार सरबत तयार..



# सुंदर लिप्ससाठी टिप्स !

**आज प्रत्येक महिला लिपस्टिकचा वापर करत आहे. त्या आपल्या संपूर्ण जीवनकालात किमान ५ किलो लिपस्टिक पोटात टाकतात पण त्याचा आरोग्यावर काही विपरित प्रभाव पडत नाही असे एका सर्वेक्षणात आढळून आले आहे. लिप्सला जर हॉट बनवायचे असेल तर खाली दिलेल्या टिप्सचा वापर करावा.**



**तुम्हाला** तुमचे आकर्षण कायम ठेवायचे असेल तर सर्वप्रथम तुम्हाला तुमच्या ओठांकडे लक्ष्य देण्याची गरज आहे. आज प्रत्येक महिला लिपस्टिकचा वापर करत आहे. त्या आपल्या संपूर्ण जीवनकालात किमान ५ किलो लिपस्टिक पोटात टाकतात पण त्याचा आरोग्यावर काही विपरित प्रभाव पडत नाही असे एका सर्वेक्षणात आढळून आले आहे. लिप्सला जर हॉट बनवायचे असेल तर खाली दिलेल्या टिप्सचा वापर करावा.

▮रोज ५ ते ६ ग्लास पाणी प्यायला पाहिजे. पाण्यामुळे फक्त शरीराला लागणारी पाण्याचीच पूर्ती पूर्ण होत नाही तर ओठांची नमी कायम राहते.

▮बऱ्याच लोकांना ओठांना चावायची सवय असते ती बदलायला पाहिजे. दीर्घ काळापर्यंत लिपस्टिकची चमक कायम ठेवण्यासाठी लिपस्टिक लावल्यानंतर टिशू पेपरने एक्स्ट्रा लिपस्टिक काढून घ्यावी. यामुळे लिपस्टिकची चमक पूर्ण दिवसभर कायम राहते.

▮डार्क कलरचे लिपस्टिक लिप्सला स्मॉल लूक देतात. जर तुमच्या ओठांचा आकार लहान असेल आणि त्याला मोठा लूक द्यायचा असेल तर नॅचरल कलरचे लिपस्टिक वापरायला पाहिजे.

▮जर ओठ जाड असतील तर कन्शिलर आणि फाऊंडेशनच्या मदतीने लिप्सला पातळ शेप देऊ शकता. लिप लायनरने आऊट लाइन ड्रॉ करावी आणि डार्क कलरचे लिपस्टिक त्यात भरायला पाहिजे.

▮जर लिप्सला हॉट लूक द्यायचा असेल तर स्ट्राबेरी आणि चेरी शेड्सचा लिपस्टिकसुद्धा लावू शकता.

▮बदलत्या मोसमाचा सर्वात जास्त प्रभाव ओठांवर पडतो. म्हणून नेहमी चांगल्या कंपनीचे लिप बाम दिवसातून दोन-तीन वेळा लावायला पाहिजे.



## उन्हाळ्यात सोडा, पॅक्ड ज्यूस वगळून केवळ प्या पाणी

**वजन कमी होतं**

हल्लीच्या लाइफस्टाइलमध्ये सगळे वाढत असलेल्या वजनामुळे परेशान असतात. अशात वजन कमी करण्यासाठी शुगर असलेले पेय पदार्थ न पिता केवळ पाणी पिणे योग्य ठरेल. याने अधिक प्रमाणात कॅलरी बर्न होण्यात मदत मिळेल.

**चयापचय क्षमता वाढेल**

केवळ पाणी पिण्याने आपली चयापचय क्षमता वाढेल आणि यामुळे ऊर्जेचे स्तरदेखील. म्हणून दिवसभर खूप पाणी प्या. या व्यतिरिक्त अधिकाधिक पाणी पिण्याने आपल्याला ध्यान केंद्रित करण्यात देखील मदत मिळेल.

**खाण्यावर नियंत्रण**

आपली डाएट घेल्यानंतरही आपल्याला भूक जाणवत असेल तर केवळ एक ग्लास पाणी प्यावे. याने वजन नियंत्रित करण्यात मदत मिळेल. अनावश्यक कॅलरीज कमी करण्यासाठी पाणी पीत राहावे.

**विषारी पदार्थ शरीरातून बाहेर काढते**

अधिक पाणी पिण्याने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात. ज्यामुळे त्वचेचे आरोग्य उत्तम राहते आणि वय वाढले तरी तारुण्य टिकून राहते. या व्यतिरिक्त अनेक आजार हाय ब्लड प्रेशर, हृदयासंबंधी आजार आणि अपचन सारखे आजार होण्याचा धोका टळतो.



## खानपानच्या ५ असंगत जोड्या
### सेवन करताना काळजी घ्या

**खाण्या-पिण्याच्या भिन्न वस्तू आरोग्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे फायदा करतात. काही पदार्थ मिसळून खाल्ल्याने फायदा होतो तर काही पदार्थ असे आहेत जे सोबत खाल्ल्याने आरोग्यावर विपरित परिणाम होऊ शकतो. तर जाणून घ्या अशा ५ जोड्यांबद्दल, ज्याचे सेवन टाळावे.**

**आंबा आणि काकडी**

उन्हाळ्यात आंबा आणि काकडी दोन्हीचे खूप सेवन केलं जातं, परंतु जेवताना दोन्ही सोबत खाणे आरोग्यासाठी नुकसानदायक ठरतं. आंबा एक फळ आहे तर काकडी भाजी म्हणून दोघांना पचनासाठी वेगवेगळ्या एनजाइम्सची गरज भासते, अशात दोन्ही सोबत खाल्ल्याने पचन संबंधी समस्या होऊ शकतात.

**डेअरी प्रॉडक्ट्स आणि पालक**

पालकासह डेअरी प्रॉडक्ट्समध्ये पनीर मिसळून तयार भाजी लोकं चव घेऊन खातात. परंतु डेअरी प्रॉडक्ट्समध्ये कॅल्शियम भरपूर प्रमाणात आढळतं आणि पालकात आढळणारे ऑक्सॅलिक ॲसिड शरीराला कॅल्शियम अवशोषित करण्यापासून थांबवतो. ज्यामुळे हे पदार्थ सोबत खाल्ल्याने फायदा होत नाही.

**दूध आणि डाळी**

अनेक पोषण विशेषज्ञाचे म्हणणे आहे की, दुधाचे पचन पोटाऐवजी छोट्या इन्टेस्टाइनमध्ये होतं आणि डाळीने तयार कोणते हा पदार्थ शरीर वेगळ्याने पचवतो. अशात दोन्ही सोबत खाल्ल्याने पचन क्रियेची गती कमी होते.

**भोजनासह फिजी ड्रिंक्स**

फिजी व कार्बोनेटेड ड्रिंक्समध्ये अती प्रमाणात साखर असते. हे भोजनासह घेतल्याने पचन प्रणाली वाईट रित्या प्रभावित होते. याने पचन क्रियेची गती कमी होते आणि सोबतच गॅस व ब्लॉटिंगसारख्या समस्या उद्‌भवू लागतात.

**दूध आणि ॲंटीबायोटिक्स**

ॲंटीबायोटिक औषध दुधासोबत घेतल्याने औषधांचा प्रभाव पडत नाही असे मानले जाते.

## बेबी मसाजचे फायदे माहीत आहेत का?

**मुलांच्या** सर्वांगीण विकासासाठी त्यांचा आहार, देखरेख व पोषक वातावरण आदी महत्त्वपूर्ण गोष्टींची काळजी घ्यावी लागते. मात्र याव्यतिरिक्त बाळ तंदुरुस्त राहावे म्हणून बेबी मसाज लाभदायी असतो. मसाजमुळे मुलांची हाडे तंदुरुस्त होतात. शिवाय मुलाच्या बुद्धीलाही चालना मिळत असते. लहान मुलाच्या मसाजचा भारतीय आयुर्वेदातही उल्लेख आढळतो.

**मसाजचे फायदे-**

▮मसाजमुळे मुलाचे वजन वाढण्यास मदत होते.

▮दिवसभरातून किमान एक वेळा मसाज केल्याने मुलाचे स्नायू बळकट होतात.

▮मसाजमुळे मुलामधील एकाग्रता वाढते.

▮ मुलाच्या पोट व पचनक्रियेसंबंधी व्याधी दूर होतात.

▮मसाजमुळे मुले व आई यांच्यात घनिष्टता वाढीस लागते.

▮मसाजमुळे मुलांना शांत झोप लागत असते.

▮मसाजमुळे मुलाचा शारीरिक व मानसिक विकास होत असतो.



## रोज एक फळ खाण्याची सवय लावा

**बऱ्याच काळापासून असे म्हटले जाते की ताजी फळे खाण्याचे फायदे खूप आहेत. यामुळेच सर्वांनी ही वस्तुस्थिती स्वीकारून आपल्या आहारात फळांचा समावेश केला आहे. फळाची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यात अनेक प्रकारची जीवनसत्त्वे, खनिजे आणि आहारातील फायबरसारखे पोषक घटक आढळतात. यामुळे आपले शरीर मजबूत होते. फळे शरीराला चांगल्या प्रकारे कार्य करण्यास मदत करण्यासाठी विविध प्रकारचे पोषक प्रदान करतात. फळांमुळेच शरीराची प्रतिकारशक्ती वाढते आणि आपल्या पेशींना दुरुस्तीची संधी मिळते. जरी असे खूप कमी लोक असतील ज्यांनी दररोज एक फळ खाण्याचा विचार केला असेल. चला जाणून घेऊया रोज एक फळ खाणे आरोग्यासाठी का महत्त्वाचे आहे?**

▸ **रक्तातील साखरेचे नियंत्रण :** सर्व फळांमध्ये नैसर्गिकरित्या साखर असते. त्यात फायबर आणि पोषक घटक देखील असतात. त्यांच्यामुळे रक्तप्रवाहात साखर शोषून घेण्याची क्षमता कमी होते. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी झपाट्याने वाढत नाही.

▸ **मानसिक आरोग्य :** फळांमध्ये नैसर्गिकरीत्या काही पोषक घटक असतात, ज्यामुळे आपले मानसिक आरोग्य चांगले राहते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे जामुन, जे मानसिक आरोग्य सुधारणारे फळ म्हणून ओळखले जाते.

▸ **वजन नियंत्रणात ठेवा :** फळांची एक चांगली गोष्ट म्हणजे त्यामध्ये कॅलरीज कमी असतात. त्यात फॅटचे प्रमाणही कमी आढळते, तर फायबर आणि पाण्याचे प्रमाण अधिक असते. यामुळेच आहारात फळांचा समावेश केल्यास वजन नियंत्रित ठेवण्यास मदत होते.

▸ **ॲंटिऑक्सिडंट्स :** फळांमध्ये ॲंटिऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात आढळतात. यामुळे, तुमच्या पेशींना ऑक्सिडेटिव्ह तणावामुळे होणारे नुकसान टाळण्याची संधी मिळते. ॲंटिऑक्सिडंट्स हृदयविकाराचा झटका, कर्करोग आणि न्यूरोडीजनरेटिव्ह विकारांचा धोका देखील कमी करतात.

▸ **पचन सुधारते :** फळे नैसर्गिक एन्झाईम्सने भरलेली असतात. यामुळे तुमची पचनक्रिया चांगली होते. उदाहरणार्थ, अननसातील ब्रोमेलेन आणि पपईतील पपेन हे पचनासाठी चांगले असतात. हे एन्झाइम प्रथिने तोडण्यास मदत करतात.



## ॲसिडिटीवर करा घरगुती उपचार

**अनेक** जणांना ॲसिडिटीचा मोठा त्रास होतो. डोकं दुखणं, मानदुखी, छातीत जळजळ होणे, उलट्या होणे, अर्धशिशी, अस्वस्थ होणे अशा प्रकारचा त्रास होतो. झोप पूर्ण न होणं, जागरण, उपाशी राहाणं, चुकीची जीवनशैली, अवेळी खाणे, झोपेच्या सतत बदलत्या वेळा यामुळे त्रास होत असतो. ॲसिडिटीचा त्रास कमी करण्यासाठी अनेक जण गोळ्या घेतात. परंतु अशा गोळ्यांमुळे काही वेळ बरं वाटतं, परंतु पुन्हा त्याचा त्रास सुरू होतो. सतत गोळ्या घेतल्याने त्याचा शरीरावरही घातक परिणाम होत असतो. परंतु ॲसिडिटीवर घरगुती उपयांनीही काही वेळात आराम मिळू शकतो.

▮सतत ॲसिडिटीचा त्रास होत असणाऱ्यांनी थंड दूध प्यायल्याने पोटात आणि छातीत होणारी जळजळ कमी होते.

▮आल्याचा तुकडा चावून खाल्ल्यानंतर त्यावर गरम पाणी प्यायल्याने फायदा होतो.

▮केळे ॲसिडिटीवर अतिशय नैसर्गिक उपाय आहे. ॲसिडिटीचा त्रास होत असल्यास नियमित केळे खाल्ल्याने फायदा होतो.

▮बडिशेप ॲसिडिटी कमी करण्यासाठी फायदेशीर आहे. जेवणानंतर बडिशेप खाल्ल्याने ॲसिडिटीचा त्रास होत नाही. बडिशेप चावून किंवा चहा करूनही पिऊ शकतात.

▮आवळा सी विटॅमिनयुक्त असतो. आवळा पोटदुखी, गॅस, ॲसिडिटीमध्ये आराम देतो. आवळा पित्त कमी करत असून केसांचं आणि त्वचेचंही आरोग्य राखतो.

▮ टोमॅटोमध्ये कॅल्शियम, फॉस्फरस आणि विटॅमिन सी असतं. जे शरीरातील जीवाणूंना बाहेर काढतं. टोमॅटो आंबट असलं तरी शरीरात क्षारांचे प्रमाण वाढवतं. टोमॅटोच्या नियमित सेवनाने ॲसिडिटीची समस्या कमी होते.

▮मसाल्यांमधील ओवा अतिशय गुणकारी आहे. ॲसिडिटीवरही ओवा फायदेशीर आहे. ॲसिडिटीचा झाल्यास ओवा आणि जिरं एकत्र भाजून घ्या. हे मिश्रण पाण्यात टाकून थोडी साखर टाकून प्यायल्याने फायदा होतो.

▮गुळात मॅग्नेशियम असतं. मॅग्नेशियम आतड्यांना मजबूत करण्याचं काम करतं. त्यामुळे पचनक्रिया सुरळीत होते. रोज जेवणानंतर गुळ खाल्ल्याने पित्त, ॲसिडिटीचा त्रास कमी होतो.

▮वेलची खाल्ल्याने ॲसिडिटीची समस्या दूर होते. एक ग्लास पाण्यात २ वेलची उकळून पाणी थंड करून प्या. त्यामुळे ॲसिडिटीचा त्रास दूर होतो.

▮तुळशीची पानंही पित्ताच्या, ॲसिडिटीच्या त्रासावर गुणकारी आहेत. पित्ताचा, ॲसिडिटीचा त्रास होत असल्यास तुळशीची काही पानं चावून खा किंवा पानं पाण्यात उकळवून ते पाणी पिण्यानेही फायदा होतो. नियमित तुळशीची पानं खाल्याने पित्ताचा त्रास कायमचा बरा होतो.



## उन्हाळ्यात जीन्स वापरताय, अशी घ्या काळजी...

**उन्हाळ्यात सगळ्यात सोयीस्कर म्हणून तुम्ही जीन्स घालत असाल, तर तुमच्यासाठी एक महत्त्वाची बातमी आहे. उन्हाळ्यात बाहेर निघालं की शरीराची अक्षरशः लाही-लाही होण्यास सुरुवात झाली आहे. अशात जर तुम्ही घट्ट जीन्स वापरत असाल, तर जीन्स वापरताना नक्की काळजी घ्या. उन्हाळ्यात घराबाहेर पडताना जीन्स-टॉप किंवा टी शर्ट आणि गॉगल लावला असा रफटफ पेहराव तुम्ही करत असाल. तर तुमच्यासाठी थोडं महत्त्वाचं...**



**जीन्स** अतिशय घट्ट असेल तर जंतुसंसर्ग होण्याचा धोका असतो. घट्ट जीन्स वापरल्यामुळे त्वचेची जळजळ, त्वचा काळवंडणं, घामोळ्या येणं, खाज सुटणं, काळे चट्टे येणं असे त्रास होऊ शकतात. गेल्या काही दिवसांत घट्ट जीन्समुळे जंतुसंसर्ग झाल्याचं प्रमाण वाढलंय. विशेष म्हणजे खाज कमी करण्यासाठी स्टेरॉईडयुक्त मलम लावलं जातं. त्यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता असते. उन्हाळा असल्यास पातळ, सुती कपडे घालणे योग्य आहे. त्यामुळे शरीरीतील घाम शोषूण घेण्यास मदत होते. जाड कपड्यांचा पेहराव शक्यतो करू नये. त्याचप्रमाणे डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतीही क्रीम वापरू नये, असा सल्ला डॉ. उदय कोपकर, त्वचारोगतज्ज्ञ यांनी दिला आहे.

उन्हाळ्यात प्रामुख्याने अतिनील किरणांमुळे डोळ्यांना त्रास होतो. गॉगल बी २ इतका काळा असणं गरजेचं आहे. यूव्ही-रेजपासून संरक्षण करणाऱ्या कॉण्टॅक्ट लेन्ससुद्धा उपलब्ध आहेत. यंदाच्या उन्हाळ्यात तुमच्या शरीराची काळजी नक्की घ्या.



**शारीरिक विकास आणि तंदुरुस्त राहणे यासाठी जीवनसत्त्वे, खनिजे यांची आवश्यकता असते. या घटकांची कमतरता असल्यास शरीराला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. ई जीवनसत्त्वही शरीरासाठी महत्त्वाचे असते. रोगांपासून बचाव करण्यासाठी ई जीवनसत्त्व गरजेचे असते. त्याची कमतरता भासल्यास केस, डोळे, त्वचा यांच्याशी निगडित अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. ई जीवनसत्त्वाची कमतरता भासल्यास शरीराकडून काही संकेत मिळतात. शरीराच्या या संकेतांकडे वेळीच लक्ष न दिल्यास अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. ई जीवनसत्त्वाच्या कमतरतेची कारणे, त्याची लक्षणे आणि कमतरता भरून काढण्यासाठी काय उपाय करावेत ते पाहूया.**

## ‘ई’ जीवनसत्त्वाची कमतरता

**कमी** चरबीयुक्त आहार घेतल्यास शरीराला ‘ई’ जीवनसत्त्वाची कमतरता भासते. ज्या लोकांना आतड्यांशी निगडित आजार आहेत. उदा, क्रोहन आणि पित्त (गॉलब्लाडर) या समस्या भेडसावत असतील त्यांच्यामध्ये ई जीवनसत्त्वाची कमतरता असते.

**लक्षणे :**

**स्नायू कमजोर होतात :** ई जीवनसत्त्वाची कमतरता असल्यास स्नायू कमजोर होतात. ई जीवनसत्त्व आणि सेलेनियमची कमतरता असल्यास मायोपॅथीची समस्या वाढते. मायोपॅथीमध्ये स्नायू सुकायला लागतात ते पसरू लागतात किंवा स्नायूंमध्ये वाकडेपणा येतो. ज्यामुळे शरीराचे अवयव वाकडे होऊ लागतात. चालण्या-फिरण्यात अडचणी निर्माण होतात. लहान मुले आणि ज्येष्ठ व्यक्ती यांना हा आजार होण्याचा धोका अधिक आहे. त्याव्यतिरिक्तही अनेक समस्या निर्माण होतात.





**दृष्टी कमी होणे :** ई जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे डोळ्यांचा रेटिना आणि डिजनरेशन पातळ होते. त्यामुळे डोळ्यातील आतल्या भागावर त्याचा परिणाम होतो. अनेकदा दृष्टी धुसर होते आणि रात्री काही न दिसण्याची समस्या म्हणजे रातआंधळेपणा येऊ शकतो.

**रक्ताची कमतरता :** अनेकदा शरीरात रक्ताची कमतरता होऊ लागते. हल्ली रक्तपेशी कमी होणे यात नवल राहिलेले नाही. ई जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळेही असे होऊ शकते. त्यामुळे शरीराला योग्य प्रमाणात ऑक्सिजन मिळत नाही आणि व्यक्ती अशक्त होऊ लागते.

**ई जीवनसत्त्वाची कमतरता कशी पूर्ण कराल?**

शाकाहारी लोकांना ई जीवनसत्त्वाची कमतरता पूर्ण करण्यासाठी भाज्या, हिरव्या पालेभाज्या, सुकामेवा, रताळे, सलगम, मोहरी, आंबा, ब्रोकोली, गहू, बीन्स, अव्हाकॅडो इत्यादींचा समावेश आपल्या आहारात करावा.

## केळी खाण्याचे असेही फायदे

**फळांमधील केळे आरोग्यासाठी अतिशय गुणकारी ठरते. केळ्यात पोटॅशियम आणि विटॅमिन भरपूर प्रमाणात असतात. त्याशिवाय केळ्यात इतरही अनेक पोषक तत्त्व असतात, जी शरीरासाठी अतिशय गुणकारी असतात. त्यामुळेच कोणत्याही प्रकारचं केळे आपल्या खाण्यात सामील केल्याने फायदे होतात. दररोज केळे खाल्ल्याने हार्ट ॲटॅकची शक्यता मोठ्या प्रमाणात कमी होते. त्याशिवाय केळ्याचे इतरही अनेक फायदे आहेत. आज वर्ल्ड बनाना डे आहे. या विशेष दिवशी जाणून घ्या अति पिकलेल्या केळ्याचे जबरदस्त फायदे.**



**केळ्याचा** रंग जसजसा काळा पडत जातो, ते अधिक, अति पिकलं जातं असं केळं अनेक जण खराब झालं म्हणून किंवा काळं आणि अतिशय मऊ झालं म्हणून खायला आवडतं नसल्याचं सांगतात. परंतु अति पिकलेलं, मऊ, काळं झालेलं केळं शरीरासाठी अतिशय गुणकारी असतं. या केळ्याच्या दररोज खाण्याने अनेक आजारांपासून दूर राहण्यास मदत होते.

रंगाच्या आधारे केळं पिकलेलं आहे किंवा कच्चं आहे याचा अंदाज लावता येतो. केळ्याचा रंग जर हिरवा असेल तर ते कच्चं केळं म्हणून ओळखलं जातं. अशा केळ्याचा वापर भाजीसाठी केला जातो. त्यानंतर केळ्याचा रंग पिवळा होत जातो. केळं अधिक पिकत गेलं की त्यावर काळे डाग पडायला सुरुवात होते. त्यानंतरही काही दिवसांत केळ्याचं संपूर्ण सालचं काळं पडत. युनायटेड नेशनमधील ‘इंटरनॅशनल फंड फॉर ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट’ या संस्थेने अति पिकून संपूर्ण साल काळं पडलेल्या केळ्याचे महत्त्व, त्याचे फायदे सांगितले आहेत. अशा केळ्यात ट्रिप्टोफॅन मोठ्या प्रमाणात असतं. त्यामुळे मानसिक ताण, चिंता (Anxiety) कमी होण्यास मदत होते. तसेच या मोठ्या प्रमाणात पोषकद्रव्ये असतात. त्यामुळे अशा केळ्याचा वापर ब्रेड बनवण्यासाठी तसेच मिल्कशेक बनवण्यासाठी केला जाऊ शकतो.

हिरवी साल असलेलं केळं खात असाल तर त्यामुळे रक्तातील साखरेचं प्रमाण नियंत्रणात ठेवण्यास मदत होते. हे केळं अगदी हळूहळू पचतं. त्यामुळे ब्लड ग्लुकोज कमी प्रमाणात निर्माण होतं. पिकलेलं केळं ॲण्टी-ऑक्सिडेंट म्हणून मानलं जातं. हे केळं मेटबॉलिज्म अर्थात चयापचन क्रियेला मजबूत करण्यात मदत करते. त्यामुळे अनेक आजार होण्याची शक्यता अतिशय कमी होते. हे केळं अगदी सहजतेने पचतं. त्यामुळे अति पिकलेल्या केळ्याचा वापर नाश्त्यामध्ये करणे अतिशय आरोग्यदायी मानले जाते. डॉक्टरांकडूनही सकाळच्या नाश्त्यात केळं खाणं गुणकारी मानले जाते.

केळे बाराही महिने बाजारात मिळणारे फळ आहे. केळ्याचा वापर सौंदर्यासाठीही केला जातो. केळं शक्तिवर्धक आहे. दररोज केळी खाणाऱ्या व्यक्तीला एनिमियाचा धोका नसतो. केळं खाल्याने मूडही चांगला राहतो. थकवा दूर होतो. केळ्यातील प्रोबायोटिक बॅक्टेरिया खाण्यातील कॅल्शियम शोषून घेते. यामुळे हाडेही मजबूत होतात.

# गेल्या वर्षात राज्यात सायबर गुन्ह्याच्या सर्वाधिक अडीच लाख तक्रारी दाखल!

**■मुंबई :** राज्यात सायबर गुन्ह्यांची सर्वाधिक नोंद गेल्या वर्षात झाली असून ऑक्टोबर २०२४ पर्यंत हाती आलेल्या आकडेवारीनुसार दोन लाख ४१ हजार तक्रारी नोंदवल्या गेल्या आहेत. सर्वाधिक तक्रारी मुंबई, ठाणे, पुण्यातील आहेत. जानेवारी ते ऑक्टोबर २०२४ पर्यंत ८११ कोटींची फसवणूक झाली आणि सायबर पोलिसांना फक्त २७ कोटी हस्तगत करता आले. २०१६ पासून आतापर्यंत ३२१६ कोटींची फसवणूक झाली आणि त्यापैकी फक्त ६१ कोटी रुपये हस्तगत करण्यात यश मिळाले आहे.

माहिती अधिकार कार्यकर्ते जितेंद्र घाडगे यांनी मिळविलेल्या या तपशिलामुळे ही गंभीर बाब उघड झाली आहे. २०१६ मध्ये ''महासायबर पोर्टल''ची स्थापना राज्य शासनाने केली. तेव्हापासून उपलब्ध असलेल्या आकडेवारीनुसार, २०१६ मध्ये २०८५ प्रकरणे नोंदवण्यात आली होती. आता ऑक्टोबर २०२४ पर्यंत ६४५० प्रकरणे नोंदवण्यात आली आहेत. गेल्या आठ वर्षांत तिप्पट वाढ झाल्याचे दिसून येते.

मुंबई, ठाणे व पुणे ही राज्यातील सर्वाधिक प्रभावित शहरे सायबर गुन्ह्यांची केंद्रे ठरली आहेत. २०२४ मध्ये मुंबईत ५४ हजार ८३६ तर पुणे आणि ठाण्यात अनुक्रमे २६ हजार ३३२ आणि २३ हजार




१४८ तक्रारी नोंदवल्या गेल्या. नवी मुंबई (१४ हजार १११), नागपूर (१३ हजार ४४२) आणि मीरा-भाईंदर-वसई-विरार (१३ हजार २२९) मध्ये सायबर गुन्ह्यांच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे या माहितीवरून दिसून येते.

सायबर गुन्ह्यांच्या प्रकरणांमध्ये वाढ होत असताना गुन्हेगारांना अटक होण्याची संख्या निराशाजनक आहे. २०२४ मध्ये सायबर फसवणुकीच्या प्रकरणांपैकी दहा टक्के प्रकरणांची उकल करणेही सायबर पोलिसांना शक्य झालेले नाही. उकल झालेल्या ५९७ प्रकरणात ६६७ जणांना अटक झाली. उपलब्ध असलेल्या २०१६ पासूनच्या आकडेवारीनुसार, २०१६ मध्ये दोन हजार ८५ प्रकरणात ९९९ कोटींची आतापर्यंतची सर्वाधिक फसवणूक नोंदली गेली.

त्यापैकी ५० टक्के प्रकरणांची उकल होऊनही प्रत्यक्षात फक्त दोन कोटी रुपये हस्तगत झाले. २०१७ ते आतापर्यंत नोंदल्या गेलेल्या तक्रारींची उकल होण्याचे प्रमाण फक्त १५ ते २० टक्के असल्याचे दिसून येते. २०२० मध्ये ३८ हजार ६५२ तक्रार नोंदल्या गेल्या होत्या. त्यात वाढ होऊन २०२३ मध्ये एक लाख ६९ हजार ३४३ तर २०२४ मध्ये दोन लाख ४१ हजार ४०५ तक्रारी नोंदल्या गेल्या आहेत, असे माहिती अधिकारात उघड झाले आहे.

सायबर फसवणुकीबाबत नोंद करण्यासाठी राष्ट्रीय सायबर गुन्हे नोंदणी पोर्टल उपलब्ध असून त्याचा संपर्क दूरध्वनी १९३० आहे तर राज्य पोलिसांचे 'महासायबर' हे पोर्टल २०१६ पासून अस्तित्वात आहे. राज्याचे अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) हे प्रमुख आहेत. याशिवाय विशेष महानिरीक्षक आणि उपमहानिरीक्षक असून १४४०७ हा संपर्क दूरध्वनी आहे. या दोन्ही पोर्टलवर ऑनलाइन तक्रार दाखल करता येते.

# अंबरनाथमध्ये कचऱ्याचे ढीग
# सफाई कामगारांचा संप



**■अंबरनाथ :** अंबरनाथ शहरात शुक्रवारी सकाळपासून कचऱ्याचे ढीग दिसू लागले असून कचरा उचलला जात नसल्याची बाब समोर आली आहे. शहरात कचरा उचलणाऱ्या कंत्राटदाराला पालिकेने तब्बल ७ महिने बिलाचे पैसे अदा केले नाही. त्यामुळे सफाई कर्मचाऱ्यांचे पगारही रखडले असून संतप्त कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी सकाळी कामबंद आंदोलन पुकारले. त्यामुळे शहरात दुर्गंधी पसण्याची शक्यता आहे.

अंबरनाथ नगरपालिकेने ऑगस्ट महिन्यात शहरातील कचरा उचलण्यासाठी एका कंपनीची नेमणूक केली होती. मात्र ऑगस्ट महिन्यापासून ते आजतागायत या कंपनीला पालिकेने बिलाचे पैसे दिलेले नाही. त्यामुळे ठेकेदाराचे आर्थिक गणितही कोलमडल्याची माहिती आहे. त्यामुळे संबंधिक कंत्राटदाराकडून सफाई कर्मचाऱ्यांनी वेतन दिले नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे संतापलेल्या घंटागाडी कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी सकाळी घंटागाडी न चालवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे अंबरनाथ शहरातील कचरा उचलला गेला नाही. याबाबत नागरिकांनी पालिका प्रशासनाकडे तक्रारी केल्यानंतर पालिका कर्मचायांची धावाधाव सुरू झाली. त्यामुळे पालिकेच्या अधिकाऱ्यांनी धावाधाव करत या कर्मचाऱ्यांची समजून काढण्याचा प्रयत्न केला. मात्र एखाद दोन महिन्याची बिले रखडल्यास पालिकेची बाजू समजून घेता येईल.

मात्र सहा महिने वेतन मिळाले नाही तर काम कसे करायचे असे सफाई कर्मचाऱ्याचे म्हणणे आहे. तर सहा महिने आर्थिक गरजा कशा भागवायच्या असा प्रश्न कंत्राटदाराने उपस्थित केला आहे. तब्बल ७ महिन्यांचं बिल रखडल्यामुळे कामगारांचे पगार, गाड्यांचा खर्च हे सगळे आता आवाक्याबाहेर गेल्याचे ठेकेदाराचे म्हणणे आहे. पालिकेच्या या भोंगळ कारभारामुळे अंबरनाथ शहरात पुन्हा एकदा कचऱ्याचे ढीग साचू लागले आहेत. त्यामुळे आता अंबरनाथ पालिकेने नागरिकांच्या दैनंदिन आरोग्याशी संबंधित असलेल्या कामांचे पैसे तरी वेळेवर द्यावेत, अशी मागणी नागरिकांमधून केली जातेय. येत्या काही दिवसात कचऱ्याचा प्रश्न निकाली न निघाल्यास शहरात दुर्गंधी पसरून आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त होते आहे.

# वाढवणजवळ कृत्रिम बेटावर विमानतळ!



**■मुंबई :** मुंबईजवळच्या वाढवण बंदराजवळ समुद्रामध्ये कृत्रिम बेट उभारून त्यावर विमानतळ उभारण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारच्या विचाराधीन आहे. तसे झाल्यास समुद्रामध्ये बांधलेले भारताचे हे पहिले विमानतळ असेल. काहीच दिवसांपूर्वी एका कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंबंधीचे संकेत दिले होते. तर, विधानसभा निवडणूक प्रचारादरम्यान पंप्रधान नरेंद्र मोदी यांनीही हे विमानतळ बांधणार असल्याचा उल्लेख केला होता. देशातील पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात परिवर्तन आणण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने घेतलेल्या पुढाकाराचा भाग म्हणून वाढवण बंदराजवळच हे विमानतळ बांधण्याचा प्रस्ताव आहे असे या प्रकरणाची माहिती असलेल्या सूत्रांनी सांगितले. प्रस्तावित वाढवण विमानतळ मुंबईच्या सध्याच्या विमानतळापासून १२५ किलोमीटर अंतरावर आहे. पश्चिम किनारपट्टीजवळ बांधल्या जाणाऱ्या या विमानतळाची रचना हाँगकाँगचे आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि ओसाकाचे कानसाई आंतरराष्ट्रीय विमानतळ यांच्याशी मिळतीजुळती असेल. ही दोन्ही विमानतळे कृत्रिम बेटांवर बांधण्यात आली आहेत. वाढवण विमानतळाला केंद्र सरकार, तसेच महाराष्ट्र सरकारची प्राथमिक मंजुरी मिळाली आहे. यासंबंधी गेल्या महिन्यात बैठक आयोजित करण्यात आली होती. विमानतळ बांधण्यासाठी आता त्याची व्यवहार्यता तपासण्यासाठी अभ्यास सुरू केला जाईल. या प्रक्रियेत भारतीय विमानतळ प्राधिकरणाची मदत घेतली जाईल. एकदा संबंधित अभ्यास पूर्ण झाले की यासाठी लागणाऱ्या गुंतवणुकीचा अंदाजे खर्च जाहीर केला जाईल.

# होळीनिमित्त कोकणवासीयांसाठी विशेष रेल्वेगाड्या

**■मुंबई :** कोकण पट्ट्यात शिमगा आणि गणेशोत्सव या सणांना विशेष महत्त्व आहे. मुंबईस्थित कोकणवासीय होळीनिमित्त कोकणातील मुळगावी जाण्याच्या तयारीत आहेत. मुंबईस्थित कोकणवासीयांची रेल्वेगाडीचे तिकीट आरक्षित करण्यासाठी लगबग सुरू आहे. कोकणात जाणाऱ्यांची संख्या लक्षात घेऊन मध्य आणि कोकण रेल्वे मार्गावरून विशेष रेल्वेगाड्या चालवण्याचे नियोजन केले आहे.

होळीनिमित्त कोकणात जाणाऱ्या प्रवाशांसाठी मध्य रेल्वे आणि कोकण रेल्वेच्या समन्वयाने रेल्वेगाड्या चालवण्यात येणार आहेत. सीएसएमटी - मडगाव, एलटीटी - मडगाव अशा रेल्वेगाड्या चालवण्यात येणार आहेत. कोकण रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, गाडी



क्रमांक ०११५१ सीएसएमटी - मडगाव विशेष रेल्वेगाडी सीएसएमटीवरून ६ मार्च, १३ मार्च रोजी मध्यरात्री १२.२० वाजता सोडण्यात येणार आहे. ही रेल्वेगाडी अनुक्रमे ७, १४ मार्च रोजी दुपारी १.३० वाजता मडगाव येथे पोहोचेल. गाडी क्रमांक ०११५२ मडगाव - सीएसएमटी विशेष रेल्वेगाडी मडगाव येथून ६ मार्च, १३ मार्च रोजी दुपारी २.१५ वाजता सोडण्यात येणार असून ही रेल्वेगाडी त्याच दिवशी मध्यरात्री ३.४५ वाजता सीएसएमटीला पोहोचेल.

या रेल्वेगाडीला दादर, ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलावडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड आणि थिवी या रेल्वे स्थानकांवर थांबा असेल. या रेल्वेगाडीला एकूण २४ डबे असतील. प्रथम श्रेणीचा एक डबा, प्रथम आणि द्वितीय श्रेणीचा एकत्र एक डबा, द्वितीय श्रेणीचे दोन डबे, तृतीय श्रेणीचे १० डबे, शयनयान चार डबे, जनरल चार डबे, एसएलआरचे दोन डबे असतील.

गाडी क्रमांक ०११२९ लोकमान्य टिळक टर्मिनस झ्र मडगाव १३ मार्च, २० मार्च रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून रात्री १०.१५ वाजता सुटेल. ही रेल्वेगाडी अनुक्रमे १४ मार्च आणि २१ मार्च रोजी दुपारी १२.४५ वाजता मडगाव येथे पोहोचेल. गाडी क्रमांक ०११३० मडगाव - लोकमान्य टिळक टर्मिनस विशेष रेल्वेगाडी १४ मार्च, २१ मार्च रोजी मडगाव येथून दुपारी १.४० वाजता सुटेल. ही रेल्वेगाडी २२ मार्च रोजी पहाटे ४.०५ वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहोचेल. या रेल्वेगाडीला ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलावडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड, थिवी आणि करमळी स्थानकांवर थांबा असेल. या रेल्वेगाडीला एकूण २० डबे असतील. प्रथम श्रेणीचा एक डबा, द्वितीय श्रेणीचे दोन डबे, तृतीय श्रेणीचे सहा डबे, शयनयानचे आठ डबे, पॅन्ट्री कारचा एक डबा, जनरेटर कारचे दोन डबे असतील. या रेल्वेगाड्यांचे तिकीट आरक्षण २४ फेब्रुवारी रोजी सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि आयआरसीटीसी या संकेतस्थळावर सुरू होईल, अशी माहिती कोकण रेल्वेद्वारे दिली.

# शाळा परिसरातले अनधिकृत बांधकाम हटवले, उल्हासनगर महापालिकेची कारवाई

**■उल्हासनगर :** उल्हासनगर महापालिकेच्या शाळांच्या आवारात काही अनधिकृत बांधकामे असल्याची बाब शाळांच्या पाहणीवेळी महापालिका आयुक्त मनिषा आव्हाळे यांच्या निदर्शनास आली होती. त्यांनी या बांधकामांना हटवण्याचे आदेश त्यांनी दिले होते. त्यानंतर अखेर पालिकेच्या अनधिकृत बांधकाम निष्कासन विभागाने कारवाई करत दोन शाळांबाहेरील बांधकामे हटवली आहेत.





उल्हासनगर महापालिका शाळांच्या दजार्बाबत सातत्याने टीका केली जाते. शिक्षण मंडळाच्या कारभारावरही अनेकदा प्रश्नचिन्हे उपस्थित केले जाते. उल्हासनगर महापालिकेच्या आयुक्तपदी रूजू झालेल्या आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी गेल्या आठवड्यात पालिकेच्या शाळांना अचानक भेट दिली होती. यावेळी त्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्याचवेळी काही वर्गांमध्ये आयुक्तांनी विद्यार्थ्यांची वाचनाची परिक्षाही घेतली. काही विद्यार्थी या वाचन चाचणीत नापास झाल्याचे दिसून आले. त्यामुळे आयुक्त आव्हाळे यांनी संबंधित वर्गाच्या शिक्षिकेला नोटीस बजावली. त्याचवेळी शाळेच्या दजार्बाबतही काम करण्याचे आदेश संबंधित विभागांना दिले.

शाळेच्या परिसरात काही अनधिकृत बांधकामे असल्याची बाब आयुक्तांच्या निदर्शनास आली. उल्हासनगर कॅम्प तीन भागातील शाळा क्रमांक ८ शेजारी अनधिकृत दुकान, तर शाळा क्रमांक १७ च्या प्रवेशद्वारालगतच्या अनधिकृत घराचे बांधकाम असल्याचे त्यांना दिसून आले होते. त्यामुळे त्यांनी अनधिकृत बांधकाम निष्कासन विभागाला यावर कारवाई आदेश दिले होते. त्यानुसार या विभागाचे नोडल अधिकारी गणेश शिंपी यांनी या बांधकामांवर कारवाई केली.

फ प्रभागाकडे मालमत्ता कर वसुलीसाठी १२४ कोटी ५५ लाखाचा लक्ष्यांक आहे. या प्रभागात न्यायालयीन प्रकरणे, जमीन, मालमत्ता वादात एकूण ७५ कोटी ४५ लाखाची रक्कम अडकून पडली आहे. ग प्रभागात मालमत्ता कराचा वसुली लक्ष्यांक १०६ कोटी २४ लाख आहे. या प्रभागात विविध प्रकारच्या गुंतवळ्यात पालिकेची ६८ कोटी २५ रक्कम अडकून पडली आहे.

# पालिकेच्या अल्प करवसुलीमुळे आयुक्त नाराज
# ८११ कोटी पैकी ६४ कोटींची कर वसुली




भिवंडी महापालिकेने २०२४-२५ या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये विविध विभागांना कर वसुलीचे उद्दीष्ट ठरवून दिले होते. यामध्ये मालमत्ता कर, विशेष शिक्षण कर, वृक्ष कर, जल निःसारण कर, विशेष स्वच्छता कर, जल लाभ कर, मल लाभ कर, अग्निशमन कर, शास्ती, व्याज, नोटीस शुल्क, वॉरंट शुल्क, इतर, नवीन पाणीपट्टी वाढ, शिक्षण कर, रोजगार हमी कर, या सवार्तून ८११ कोटी १९ लाखांच्या कर वसुलीचे उद्दीष्ट पालिकेने ठरवून दिलेले आहे. परंतु २१ फेब्रुवारीपर्यंत पालिकेच्या तिजोरीत विविध कर वसुलीतून ६४ कोटी ४७ लाख रुपयांचा महसुल मिळाला आहे. प्रत्यक्षात कर वसुलीचे उद्दीष्ट आणि त्या तुलनेत कर वसुलीचे प्रमाण अत्यंत कमी दिसून येत असून याच मुद्द्यावरून आयुक्त अनमोल सागर यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच कर वसुली वाढवण्यासाठी स्थावर आणि जंगम मालमत्ता जप्त करणे, नळ जोडणी खंडीत करणे, अशी कारवाई अधिकाअधिक तीव्र कारवाई करण्याचे आदेश त्यांनी सर्व संबंधित अधिकारी, लिपिकांना दिले.

**■ठाणे :** भिवंडी महापालिकेने अर्थसंकल्पामध्ये विविध विभागांना ८११ कोटी रुपयांच्या कर वसुलीचे उद्दीष्ट ठरवून दिलेले असतानाही फेब्रुवारी महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत पालिकेच्या तिजोरीत जेमतेम ६४ कोटी ४७ लाख रुपयांचा कर जमा झाला आहे. कर वसुलीचे उद्दीष्ट आणि त्यात अत्यंत कमी प्रमाणात झालेल्या कर वसुलीच्या मुद्द्यावरून पालिका आयुक्त अनमोल सागर यांनी आढावा बैठकीत नाराजी व्यक्त करत कर वसुलीवर भर देण्याचे आदेश दिले आहेत.

भिवंडी महापालिकेचे नवनियुक्त आयुक्त तथा प्रशासक अनमोल सागर यांनी पालिकेचा कारभार हाती घेतला असून त्याचबरोबर त्यांनी विविध विभागांच्या कामांचा आढावा घेण्याबरोबरच कर वसुलीवर भर देण्यास सुरूवात केली आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी नुकतीच बैठक घेऊन त्यात मालमत्ता कर, पाणी देयक यासह इतर कर वसुलीचा आढावा घेतला. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त देविदास पवार, उपायुक्त (कर) बाळकृष्ण क्षीरसागर तसेच प्रभाग समिती क्रमांक १ ते ५ मधील सर्व करवसुली अधिकारी उपस्थित होते.

भिवंडी पालिकेच्या अधिकाऱ्यांनी कर वसुलीचा लेखाजोखा बैठकीत मांडला. यानुसार उत्पन्न वसुलीचे उद्दीष्ट ८११ कोटी १९ लाख इतके असून त्यापैकी ६४ कोटी ४७ लाख इतकीच वसुली झाली आहे. तसेच १ ते १५ फेब्रुवारीदरम्यान लागू केलेल्या अभय योजनेमुळे २१ कोटी रुपयांची कर वसुली झाली असून पालिकेच्या आतापर्यंतच्या इतिहासातील ही सर्वात जास्त वसुली झाल्याचा दावा अधिकाऱ्यांनी बैठकीत केला.

# अलिबागच्या सासवणेतील ते विकृत तरुण कोण, कोण टाकतात महिलांच्या नावाने अश्लील चिठ्ठ्या

**■अलिबाग :** गावातील काही विकृत युवकांनी गावातील आया-बहिणींना अश्लील चिठ्ठ्या पाठवण्याचे उद्योग सुरू केल्याने अलिबाग तालुक्यातील सासवणे ग्रामस्थ संतप्त झाले आहेत. त्यांनी या तरुणांवर कारवाई करण्याची मागणी पोलीस अधीक्षकांकडे केली आहे. तसेच या युवकांच्या विकृत वागण्याचा व्यायामशाळा परिसरात जमून एकत्रित निषेध केला आहे. सासवणे गावातील संतश्रेष्ठ पेडणेकर महाराज मठ परिसरात सरकारी जागेत महिला व्यायामशाळा बांधली आहे. या व्यायामशाळेलगत तलाव आणि झाडे होती. ती झाडे तोडून आणि तलाव बुजवून तिथे क्रिकेटचे बेकायदा मैदान तयार करण्यात आले. याकडे ग्रामपंचायतीने पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. येथे कोळीवाड्यातील मुले क्रिकेट खेळायला येत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. काही दिवसांपूर्वी व्यायामशाळा इमारतीवर क्रिकेटचे साहित्य ठेवण्यासाठी त्यांनी रूम बांधण्याचा प्रयत्न केला. याला गावातील महिलांनी तसेच ग्रामस्थांनी विरोध केला आणि त्यांचे काम बंद पाडले. यानंतर या तरुणांनी व्यायामशाळेवर बेकायदा सीसीटीव्ही कॅमेरा जोडला. सासवणेतील महिलांनी व्यायामशाळा इमारतीच्यावर क्रिकेटचे साहित्य ठेवण्यासाठी या तरुणांना बांधकाम करण्यास विरोध केला. याचा राग आल्याने काही



विकृत तरुणांनी व्यायामशाळेत अश्लील भाषेतील मजकुराच्या चिठ्ठ्या टाकल्या. या महिलांनी मांडवा पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. तसेच अशा अश्लील भाषेतील चिठ्ठ्या काही महिलांच्या घरातदेखील टाकल्या आहेत. यामुळे महिला संतप्त झाल्या असून संपूर्ण सासवणे ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. त्यांनी याबाबत जिल्हा प्रशासनासह पोलीस अधीक्षक तसेच गृह विभागाला निवेदन देत या तरुणांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तक्रार अर्जावर ३८४ ग्रामस्थांच्या सह्या आहेत. या शिवाय सर्व ग्रामस्थानी व्यायामशाळा परिसरात जमून तरुणांच्या विकृत मनोवृत्तीचा निषेध केला आहे.

# पंख्याची तार इलेक्ट्रीक बोर्डला लावून दिली नाही म्हणून मित्राची हत्या, एकाला अटक

**■ठाणे :** पंख्याची तार इलेक्ट्रीक बोर्डला लावण्यास विरोध केल्याने एका राजस्थानी मजूराची त्याच्याच मित्राने डोक्यात लोखंडी वस्तूने प्रहार करून हत्या केल्याचा प्रकार भिवंडीतील पडघा भागात उघडकीस आला आहे. सुरेंद्र चौधरी (२२) असे मृत मजूराचे नाव असून त्याच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी रमण सिंह (३६) याला अटक केली आहे. दोघेही मजूर राजस्थानच्या आलवर या जिल्ह्यात वास्तव्य करत होते. ते काही वर्षांपूर्वीच येथील गोदामामध्ये मजूरीसाठी आले होते.




भिवंडी येथील भोईरगाव परिसरात एका गोदामामध्ये सुरेंद्र चौधरी, रमण आणि त्यांच्यासह पाचजण मजूर म्हणून काम करतात. येथील गोदामात एका पत्र्याचे लहान आकाराचे शेड उभारण्यात आले असून याच शेडमध्ये पाचही जण वास्तव्य करतात. हे पाचही जण मूळचे राजस्थान आणि उत्तरप्रदेश येथील आहेत. १८ फेब्रुवारीला सायंकाळी ६.३० वाजताच्या सुमारास गोदामामधील कामे आवरून सर्व मजूर शेडमध्ये निघून गेले होते. रात्री जेवल्यानंतर सर्वजण झोपण्यासाठी जात होते. रात्री १० वाजताच्या सुमारास रमण सिंह हा येथील इलेक्ट्रीक बोर्डमध्ये पंख्याची तार लावत होता. त्यास सुरेंद्र याने विरोध केला. त्यामुळे त्या दोघांमध्ये वाद झाला. त्यांचा वाद झटापटीपर्यंत गेला होता. त्यानंतर इतर मजूरांनी त्यांच्यामधील वाद सोडविला.

काही वेळानंतर रमण सिंह हा त्याठिकाणी आला. त्याने शेडमध्ये पडलेली लोखंडी वस्तू हातात घेऊन सुरेंद्र याच्या मागून त्या वस्तूने त्याच्या डोक्यात प्रहार केला. यात सुरेंद्र यांना गंभीर दुखापत झाली. ते जागीच कोसळले. त्यानंतर मजुरांनी आरडाओरड केला. रक्तस्त्राव झाल्याने सुरेंद्र याला येथील एका जेसीबी गाडीतून उपचारासाठी भिवंडीतील आयजीएम या सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. रमण हा देखील त्यांच्यासोबत रुग्णालयात गेला होता. परंतु सुरेंद्र याला डॉक्टरांनी मध्यरात्री १२.३० वाजता मृत घोषित केले.

याप्रकरणी मजूराने दिलेल्या तक्रारीच्या आधारे पडघा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी रमण याला ताब्यात घेऊन त्याला अटक केली आहे. रमण आणि सुरेंद्र हे राजस्थानमधील आलवर जिल्ह्यातील रहिवासी आहेत. गोदामामध्ये मजूरी करण्यासाठी ते मागील काही वर्षांपासून वास्तव्य करत होते. अतिशय क्षुल्लक कारणावरून सुरेंद्र याची हत्या झाल्याने मजूरांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे.

# गेल्या १३ वर्षांपासून फरार आरोपीला अखेर अटक

**■मुंबई :** गेल्या १३ वर्षांपासून स्वतःची ओळख बदलून विविध ठिकाणी राहणाऱ्या फरार आरोपीला अटक करण्यात ॲन्टॉप हिल पोलिसांना यश आले. पोलिसांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे शीव कोळीवाडा येथे सापळा रचून आरोपीला पकडले. त्याच्याविरोधात घरात शिरून हत्येचा प्रयत्न केल्याचा गंभीर गुन्हा दाखल केला. आरोपी कुप्पन मारीअप्पन देवेंद्र (वय ३६) याच्याविरोधात २०१२ मध्ये भारतीय दंड संहिता कलम ३०७ (खूनाचा प्रयत्न), ४५२ (बळजबरीने घरात घुसणे), ३२४, ३२३ (जखमी करणे), तसेच १४३, १४४, १४६, १४७, १४८,१४९ (बेकायदेशीर जमाव) आणि शस्त्र कायदा ४, २५, तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) सह १३५ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला होता. पण आरोपी गेल्या अनेक वर्षांपासून बेपत्ता होता. त्याच्यावर स्थायी वॉरंटही जारी करण्यात आले होते. अपर पोलीस आयुक्त अनिल पारसकर व अतिरिक्त सत्र न्यायालय क्र. ३० यांनी ॲन्टॉप हिल पोलिसांना याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यानुसार, पोलीस उपायुक्त रागसुधा आर. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुधाकर ढाणे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १03, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००01४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com